## गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्यांना आता 'मकोका' लागणार



**मुंबई :** गोवंशाची अवैध वाहतूक आणि कत्तल करणारे, त्यासोबतच अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या कत्तलखान्यांना कायमचा पायबंद घालण्यासाठी गृह विभागाने मार्गदर्शक शासन परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार प्रचलित कायदे धाब्यावर बसवून वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळ्या किंवा संघटनांविरुद्ध आता थेट महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम अर्थात 'मकोका' अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहेत. संविधानाच्या अनुच्छेद ४८मधील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून दुभत्या जनावरांचे विशेषतः गाई व वासरांचे रक्षण, जतन व संवर्धन करण्यासाठी गृह विभागाने हे व्यापक पाऊल उचलले आहे. जारी करण्यात आलेल्या अधिकृत परिपत्रकाची राज्यभरात तातडीने आणि काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३०३
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २२ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


महाडमध्ये सरपंचाला मारहाण; चौघांविरोधात गुन्हा/२

दिल्ली-मुंबई महामार्ग पनवेलमधून जाणार/६

कॅरम स्पर्धेत समृद्धी, अझर ठरले विजेते/८


# पीककर्जासाठी 'सिबिल'ची अट नको!

## मुख्यमंत्री फडणवीस यांची बँकांना सूचना; शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर असताना राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी दोन महत्त्वाचे निर्णय जाहीर करीत मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे जूनमध्ये कर्जमाफीची अंमलबजावणी वेळेत करण्यासाठी हालचाली सुरू झाल्याचे स्पष्ट करण्यात आले, तर दुसरीकडे पीककर्जासाठी शेतकऱ्यांकडून 'सिबिल स्कोअर' मागण्यास स्पष्ट नकार देत बँकांना कडक शब्दांत सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.२१) मुंबईत झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी, फलोत्पादन खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह विविध विभागांचे मंत्री, राज्यमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बैठकीत खरीप हंगाम, बियाणे-खतांचा पुरवठा, संभाव्य दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपण ३० जूनपूर्वी कर्जमाफी करत आहोत. यामुळे पुढच्या हंगामासाठी जास्तीत जास्त शेतकरी पात्र होतील. बहुतांश शेतकरी जूनच्या शेवटी कर्ज घेत असतात. त्यामुळे यावर्षी जास्त शेतकरी पात्र होतील. बँकांना आम्ही सांगितले आहे की, एकदा आम्ही यादी संमत केल्यानंतर आमचे पैसे जमा झाले नाही तरी त्यांना कर्ज द्या, कारण आमचे पैसे उद्या कधी ना कधी जमा होणारच आहेत. जरी विलंब झाला तरी तुम्हाला त्यावर व्याज मिळणार आहे. जी थकित आहेत ती कर्ज आपण माफ करणार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्त्वाची घोषणा म्हणजे पीककर्जासाठी सिबिल स्कोअरची सक्ती होणार नाही. अनेक शेतकऱ्यांकडून खराब क्रेडिट स्कोअरमुळे पीककर्ज नाकारले जात असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. यावर सरकारने राष्ट्रीयकृत बँकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, पीककर्जासाठी कोणत्याही शेतकऱ्याची सिबिलच्या कारणावरून अडवणूक होऊ नये. प्रत्येक शाखेला यासंदर्भात लिखित सूचना देण्याचे आदेश देण्यात आले असून राज्यस्तरीय बँकिंग कमिटीचीही बैठक झाली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यंदा अल निनोचे मोठे संकट आहे. खरीप हंगामाच्या बैठकीत हवामानाच्या अंदाजानुसार काय उपाययोजना करता येतील याचा आढावा घेतला. पाऊस उतरत्या क्रमाने असण्याची शक्यता आहे. पावसाच्या दोन दिवसांतही मोठे अंतर येऊ शकते, ज्याचा भार पिकांवर पडेल. त्यामुळे जलयुक्त शिवार योजनेची कामे वेगाने करण्यास सांगितले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. अल निनो २०१५चे वर्ष जास्त कठीण होते. अशी स्थिती आली तर काय करायचे याचीही योजना करण्यास सूचित केले आहे. पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करता येईल यासाठी प्रयत्न करावे लागेल, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

राज्याला २०.१६ लाख मेट्रिक टन बियाणांची आवश्यकता असताना तब्बल २८ लाख मेट्रिक टन बियाणे उपलब्ध आहे. हे सर्व बियाणे प्रमाणित असावे आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी सारथी पोर्टल तयार करण्यात आले असून या पोर्टलवरील प्रमाणित बियाणेच विकत घेण्याचा आग्रह शेतकऱ्यांना केला जात आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. खतांसंदर्भात ४८ लाख मेट्रिक टन आवश्यकतेपैकी २५ लाख मेट्रिक टन खत सध्या उपलब्ध आहे. बनावट बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या विरोधात मोठी तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. काही ठिकाणी अनुदानित खतांसोबत विनाअनुदानित खते खरेदी करण्याची सक्ती व्यापाऱ्यांकडून केली जाते, मात्र अशी सक्ती केल्यास संबंधित विक्रेत्यांवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

### कृषी क्षेत्राला डिजिटल तंत्रज्ञानाची जोड

शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे डिजिटल निर्णय घेतले आहेत, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यामध्ये 'महाविस्तार २.०' हे ॲप लॉन्च करण्यात आले असून यावरून शेतकऱ्यांना परिपूर्ण माहिती व एआय आधारित कॉलिंगद्वारे मार्गदर्शन मिळेल. या प्रणालीशी राज्यातील चारही कृषी विद्यापीठे जोडली गेली आहेत. यासोबतच 'डिजिटल क्रॉप सर्व्हे'मुळे शेतकरी स्वतःच्या मोबाइलने पिकांचा सर्व्हे करू शकतील. 'सेंट्रल बँक डिजिटल करन्सी' आणि 'ब्ल्यूप्रिंट फॉर ट्रेसेबिलिटी इन क्रॉप्स अँड फूड' या व्यवस्थेमुळे एखादे पीक कुठल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील शेतात तयार झाले आणि त्यात काय वापरले याचे प्रमाणपत्र उपलब्ध होईल. या सर्व योजना 'ॲग्रीस्टॅट'ला जोडल्या गेल्याने कोणालाही योजनेचा गैरफायदा घेता येणार नाही. २०२५-२६ मध्ये महाडीबीटीच्या माध्यमातून ९१ हजार ६४९ कोटी रुपये थेट वितरित करण्यात आले असून सेंद्रिय व नैसर्गिक शेतीसाठी विशेष मिशन सुरू करण्यात आले आहे तसेच एआयच्या वापरामुळे उत्पादन खर्च २५ टक्क्यांनी कमी करून उत्पादकता वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

# उत्तर रायगड भाजपमध्ये संघटनात्मक नियुक्त्या जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्ह्यांतर्गत मंडळ, विविध मोर्चे, आघाडी आणि सेलच्या संघटनात्मक नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

उत्तर रायगड जिल्हा संघटनात्मक नियुक्ती मोर्चा आघाडी सेल नियुक्त्यांमध्ये आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी सीताराम चौधरी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्षपदी सागर सांगडे, दक्षिण भारतीय सेल जिल्हा संयोजकपदी सुजित पुजारी, कामगार आघाडी जिल्हा संयोजकपदी रवींद्र नाईक, शिक्षक सेल जिल्हा संयोजकपदी सागर रंधवे, वैद्यकीय सेल जिल्हा संयोजकपदी डॉ. संतोष आगलावे, कायदा सेल जिल्हा संयोजकपदी ॲड. गायत्री परांजपे, व्यापारी आघाडी जिल्हा संयोजकपदी संजय तन्ना, मच्छीमार सेल जिल्हा संयोजकपदी प्रदीप नाखवा, बेटी बचावो बेटी पढाओ जिल्हा संयोजकपदी नीता माळी आणि अभियंता सेल जिल्हा संयोजकपदी अल्पेश पाडावे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय महिला मोर्चा, युवा मोर्चा, अनुसूचित जाती मोर्चा, ओबीसी मोर्चा तसेच विविध मंडळांमध्येही सरचिटणीसपदांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी दिशा जाधव व शिल्पा म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी अक्षय सिंग व मनोज पारटे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी अनुप शिंदे व अक्षय लोखंडे, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी अविनाश गाताडे व यतीन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय नवीन पनवेल मंडल सरचिटणीसपदी प्रशांत फुलपगार तर खोपोली मंडल सरचिटणीसपदी विनायक माडपे व विकास खुरपुडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत आगामी काळात पक्षसंघटना अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येकाने सक्रियपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.



**पनवेल : दानशूर व्यक्तिमत्त्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्ष मोठ्या उत्साहात साजरे होत आहे. यानिमित्त उलवे नोड सेक्टर १७ येथील हनुमान मंदिर कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी कमिटीचे अध्यक्ष विकास सिंह, सहसचिव मनोजकुमार मौर्य, उपाध्यक्ष सुनीलकुमार मौर्य, सहखजिनदार सुभाष पांडे, विवेक दुबे, प्रवीण पांडे आदी उपस्थित होते.**

## निवडक

### पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड हमजा बुरहान गोळीबारात ठार

**श्रीनगर :** पुलवामा येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड हमजा बुरहान याचा गोळीबारात मृत्यू झाला आहे. ही घटना पाकव्याप्त काश्मीरमध्ये मुझफ्फराबाद येथे घडली. बुरहान आपल्या कार्यालयात बसला असताना काही लोक तिथे आले आणि त्यांनी हमजावर गोळीबार केला. यात तो ठार झाला. पीओकेमधील दहशतवादी संघटनांना तो प्रशिक्षण देत होता तसेच दहशतवाद्यांना सीमा भागात घुसखोरी करण्यास मदत करीत असे.

### बंगळुरूमध्ये विमानाचा अपघात टळला; प्रवासी, क्रू मेंबर्स सुरक्षित

**बंगळुरू :** येथील केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी (दि.२०) दिल्लीहून बंगळुरूला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचा लँडिंगदरम्यान भीषण अपघात होता होता टळला. धावपट्टीवर उतरत असताना विमानाचा मागचा भाग अचानक रनवेला घासल्याने टेलस्ट्राइक झाला. सुदैवाने पायलटच्या प्रसंगावधानाने मोठा अनर्थ टळला असून विमानात असलेले सर्व १७९ प्रवासी आणि क्रू मेंबर्स सुरक्षित आहेत.

# राज्यात आता अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली

**मुंबई : प्रतिनिधी**

अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली 'भारत फोरकास्ट सिस्टम'चा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले असून हवामान पूर्वसूचना, स्थानिक पातळीवरील तयारी आणि समन्वित प्रतिसाद यामध्ये मोठी सुधारणा होईल. यासाठी भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेसमवेत करार महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन क्षमतेला अधिक बळकट करणारा महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था, पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार केला असून यामुळे राज्याच्या आपत्तीपूर्व तयारी आणि अतिवृष्टीसारख्या हवामानाशी संबंधित संकटांना प्रतिसाद देण्याच्या क्षमतेत मोठी



वाढ होणार आहे.

या करारामुळे भारतीय हवामान विभागाच्या मिशन मौसम अंतर्गत विकसित करण्यात आलेली स्वदेशी भारत फोरकास्ट सिस्टम आता राज्याच्या निर्णयप्रक्रियेत वापरली जाणार आहे. राज्य आपत्कालीन कार्य संचालन केंद्र आणि भू-स्थानिक निर्णय सहाय्य प्रणाली यांच्या माध्यमातून ती कार्यान्वित केली जाईल. यामुळे उष्णतेची लाट, मुसळधार पाऊस, वादळ, पूर आणि भूस्खलन यांसारख्या आपत्तींबाबत अधिक वेगवान आणि प्रभावी पूर्वतयारी शक्य होणार आहे. हवामानासंबंधी माहिती दर तीन तासांनी अद्ययावत केली जाणार असून पर्जन्यमान, कमाल-किमान तापमान, वातावरणीय दाब, वाऱ्याचा वेग व दिशा तसेच ढगांचे प्रमाण याबाबत जवळपास प्रत्यक्ष वेळेत माहिती उपलब्ध होईल.

### पूर्वसूचना आणि संदेश मिळणार

या उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी तीन तासांच्या अंतराने उच्च-रिझोल्यूशन हवामान अंदाज, प्रभावाधारित पूर्वसूचना, स्वयंचलित अलर्ट प्रणाली तसेच सायरन, मोबाइल संदेश आणि सार्वजनिक प्रसारणाद्वारे एकाच वेळी सूचना प्रसारित करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेवटच्या टप्प्यातील नागरिकांपर्यंत वेळेवर इशारे पोहचवणे अधिक प्रभावी होईल. आपत्कालीन आपत्ती प्रतिसाद व मदतीसाठी क्रमांक एसडीएमए १०७०, डीडीएमए १०७७ रुग्णवाहिका व वैद्यकीय आपत्कालीन सेवा १०८ असे आहेत.

# 'नीट' पेपरफुटी; डॉक्टरला अटक

**लातूर : प्रतिनिधी**

देशभरात खळबळ उडवणाऱ्या 'नीट' प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणात सीबीआयने आणखी एक मोठी कारवाई केली आहे. लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरूरे यांना अटक करण्यात आली असून त्यांनी स्वतःच्या मुलासाठी परीक्षेपूर्वी फुटलेली नीट प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा गंभीर आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार डॉ. शिरूरे यांनी मोटेगावकर नावाच्या व्यक्तीकडून प्रश्नपत्रिका विकत घेतल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. तपासादरम्यान सीबीआयने बुधवारी पुण्यात अनेक विद्यार्थ्यांच्या घरांवर धाडी टाकल्या होत्या. त्यानंतर रात्री उशिरा लातूरमधून डॉ. शिरूरे यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. चौकशीनंतर सीबीआयने त्यांना अटक केली.

# किल्ले रायगडचा पायरी मार्ग दोन दिवस राहणार बंद

**रायगड : रामप्रहर वृत्त**

किल्ले रायगडावर यंदाचा शिवराज्याभिषेक सोहळा तारखेनुसार ६ जून आणि तिथीनुसार २६ जून रोजी साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यातील मोठ्या प्रमाणात शिवप्रेमी नागरिक आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन उपाययोजना करण्यासाठी किल्ले रायगडावर चढण्या-उतरण्यासाठीचा पायरी मार्ग ३० व ३१ मे या दोन दिवसांसाठी पूर्णपणे बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष किशन जावळे यांनी जारी केला आहे.

शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार असल्याने गर्दी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५मधील तरतुदींनुसार कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी प्रतिबंधात्मक कार्य,



सौम्यीकरण उपाययोजना, तत्काळ प्रतिसाद, मदत व पुनर्वसन, समन्वय इ. कार्य करावयाचे आहे.

सन २०२३च्या शिवराज्याभिषेक सोहळ्यावेळी महादरवाजाच्या खालील बाजूस असलेल्या उंच कड्यावरून पडलेल्या दगडामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या वर्षीच्या सोहळ्याआधी या ठिकाणाहून उंच कड्यावरील मोकळे दगड काढून घेणे आवश्यक आहे. दगड-दरड प्रशिक्षित रॅपलर्सच्या मदतीने काढण्यासाठी दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई यांनी सहमती दर्शविली असून ३० व ३१ मे रोजी मोहीम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत रायगड रोप वे सुरू असणार आहे.

# सिंधुदुर्गात देशातील पहिले अंडरवॉटर म्युझियम साकार


## 'एक्स-आयएनएस गुलदार'मुळे पर्यटनाला मिळणार चालना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी)मार्फत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक परिसरात भारतीय नौदलाची सेवानिवृत्त युद्धनौका "एक्स-आयएनएस गुलदार" समुद्रतळावर यशस्वीरित्या स्थापित करण्यात आली असून देशातील अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि वैशिष्ट्यपूर्ण पाणबुडी पर्यटन प्रकल्प साकार होत आहे.

मे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्या समन्वयाने राबविण्यात येणारा हा प्रकल्प भारतीय पर्यटन क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले असून हा प्रकल्प जागतिक स्तरावर सागरी पर्यटन आकर्षण म्हणून उदयास येणार आहे, अशी माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

भारतातील पहिल्या एकात्मिक सबमरीनद्वारे अनुभवात्मक पर्यटनाची सुरुवात होत असून या पर्यटनस्थळामध्ये मार्गदर्शित व्रेक डायव्हिंग व सबमरीन अनुभव, डिस्कव्हर स्कुबा डायव्हिंग (१२ मीटरपर्यंत), प्रमाणित डायव्हर मोहिमा (१८ मीटरपर्यंत), ॲडव्हान्स डायव्हिंग अनुभव



(३० मीटरपर्यंत), अंडरवॉटर फोटोग्राफी पर्यटन, सागरी शिक्षण व संशोधन करता येणार आहे. डायव्हिंग स्लॉट्स, सबमरीन बुकिंग आणि पर्यटक सुविधांबाबतची माहिती लवकरच एमटीडीसीच्या अधिकृत माध्यमांतून जाहीर करण्यात येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती प्राप्त झाली असून राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे सहकार्य, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे आणि एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे (भाप्रसे) यांच्या प्रयत्नांतून या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पर्यटन मंत्रालय, भारत सरकारच्या जागतिक दर्जावर आयकॉनिक पर्यटन केंद्रांचा विकास भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य या योजनेंतर्गत एमटीडीसीमार्फत विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने ४६.९१ कोटी रुपये, तर महाराष्ट्र शासनाने ११२.४६ कोटी रुपये इतक्या रकमेस मंजुरी दिली आहे.

### अशी आहे युद्धनौका

*एक्स-आयएनएस गुलदार ही भारतीय नौदलातील "मगर" वर्गातील लँडिंग शिप टँक प्रकारातील युद्धनौका असून तिने तब्बल ३९ वर्षे राष्ट्रसेवा बजावून १२ जानेवारी २०२४ रोजी भारतीय नौदलामधून निवृत्त झाली. पोलंडमधील ग्डिनिया शिपयार्ड येथे ३० डिसेंबर १९८५ रोजी नौकेचे उद्घाटन झाले होते. ८३.९ मीटर लांबीची ही नौका १९ मे रोजी सिंधुदुर्ग किनाऱ्यावरील निवती रॉक परिसरात सुमारे २२ मीटर खोलीवर समुद्रतळावर स्थापित करण्यात आली आहे.*

# रायगडच्या विद्यार्थ्यांची 'इस्रो'वारीसाठी निवड

**नागोठणे : बातमीदार**

गुरूकुल एज्युकेशन सोसायटी कोल्हापूरच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले असून जिल्ह्यातील चार विद्यार्थ्यांची थेट बंगळुरू येथील इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या भेटीसाठी निवड झाली आहे.

रायगड जिल्ह्यात प्रथमच गुरुकुल एज्युकेशन सोसायटीच्या वतीने जिल्हा प्रमुख अशोक अहिरे यांच्या देखरेखीखाली स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्ह्यातून तब्बल ३६१७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी ज्ञानकूर स्कूलचे चेअरमन रवि लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत बावदाने आणि नागोठणे विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के यांनीही अहोरात्र मेहनत घेतली.



परीक्षेत रायगड जिल्ह्यातून चार विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर विशेष यश मिळवले. यामध्ये सार्थक सुहास माने (इयत्ता सातवी, सीकेटी इंग्लिश मीडियम स्कूल, नवीन पनवेल), विनीत विनोद कापसे (इयत्ता आठवी, द.ग. तटकरे उच्च माध्यमिक विद्यालय, कोलाड), साई योगेश म्हात्रे (इयत्ता सातवी, रजिप पिगोंडे शाळा, नागोठणे परिसर) आणि शुब्रा सुधीर शिंदे (ग.बा. वडेर हायस्कूल, पाली) यांचा समावेश आहे. हे चारही विद्यार्थी ४ जून रोजी इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी रवाना होणार असून राज्यातील मेरिट यादीत एकूण ६२ विद्यार्थ्यांमध्ये रायगडचे चार विद्यार्थी स्थान मिळवण्यात यशस्वी ठरल्याने जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र-दक्षिण कोरिया भागीदारीतून कौशल्य विकासाला नवे बळ मिळणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

नवीन युगातील उद्योग,व्यवसाय आणि कौशल्य विकासामध्ये दक्षिण कोरियाने जागतिक स्तरावर आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र व दक्षिण कोरियात झालेल्या सामंजस्य सहकार्यामुळे कोरियाचे उत्कृष्ट कौशल्य आणि प्रगत तंत्रज्ञान भारतात येईल, ज्याचा थेट फायदा भारतीय विद्यार्थ्यांना होणार आहे. या सांमज्यस कराराच्या माध्यमातून मूलभूत औद्योगिक कौशल्यांपासून ते उच्च-स्तरीय प्रगत कौशल्यांपर्यंत सर्व स्तरांवरील प्रशिक्षणावर मदत होईल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.




सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यात विभागाअंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय आणि दक्षिण कोरियाच्या कोरिया पॉलिटेक्निक्स,महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था आणि दक्षिण कोरियाच्या नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर लाइफलाँग एज्युकेशन,रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि दक्षिण कोरियातील प्रतिष्ठित संस्थेच्या दोन शाखांमध्ये असे एकूण तीन सामंजस्य करार सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ.सतीश सुर्यवंशी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपुर्वा पालकर, केंद्र सरकारचे डायरेक्टर जनरल ट्रेनिंग दिलीप कुमार, नॅशनल स्किल इन्स्टिट्यूटचे प्रादेशिक संचालक सी. एस. मूर्ती, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे आयुक्त डॉ.अमित सैनी, मुंबई शहर च्या जिल्हाधिकारी आंचल गोयल,कोरिया प्रजासत्ताकाच्या शिष्टमंडळामध्ये कोरिया ॲडव्हान्स्ड इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (KAIST) येथील डॉ. स्युंग हुन हान, कोरिया पॉलिटेक्निक्सच्या डॉ. यंगआह कांग, तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर लाइफलाँग एज्युकेशन (NILE) च्या सुश्री मिन-सिऑन पार्क यांच्यासह क्रेविट आणि केईस आणि नेक्सन टेक्नॉलॉजी संस्थांचे वरिष्ठ प्रतिनिधी सहभागी होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भारताच्या लोकसंख्येचा आणि तरुण पिढीच्या नाविन्यतेचा फायदा देशाच्या विकासासाठी करून घेण्यासाठी कौशल्य विकास विभागाने एक मोठे पाऊल उचलले आहे. भारताला मोठ्या भौगोलिक आणि लोकसंख्येचा फायदा मिळाला आहे. देशाची जवळपास ६५% लोकसंख्या ३५ वर्षांखालील असून हा वयोगट आपली खरी ताकद आहे. या वयोगटातील नाविण्यतेचा 'मानवी संसाधनात' रूपांतर करणे हे आपले मुख्य ध्येय आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. राज्याची अर्थव्यवस्था सध्या ६६० अब्ज डॉलर्सची असून ती लवकरच एक ट्रिलियन डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी औद्योगिक परिसंस्थेला सर्व स्तरांवर उत्तम कौशल्यांची गरज आहे.

यासाठी हा आंतरराष्ट्रीय कौशल्य करार महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला मोठी गती देणारा ठरेल. हा करार केवळ कागदावर न राहता त्याचे लवकरच प्रत्यक्ष कृतीत रूपांतर केले जाईल. या ऐतिहासिक सहकार्यामुळे उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळ मिळेल आणि भारतीय तरुणांसाठी जागतिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

## सरपंचाला मारहाण; चौघांविरोधात गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील सवाने या गावात क्रिकेटच्या खेळातून झालेल्या वादावादीत शिंदे गटाचे सरपंच यशवंत पवार यांना बेदम मारहाण करण्यात आली याप्रकरणी औद्योगिक वसाहत पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

महाड आणि पोलादपूर तालुक्यातील सरपंचांना मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच आज महाड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सवाने येथील विद्यमान सरपंचाला काठीने बेदम मारहाण झाल्याची घटना नुकतीच घडली आहे.

सविस्तर माहिती अशी की दिनांक १८ मे रोजी मुलांच्या क्रिकेट खेळण्याच्या वादातून जाब विचारण्यासाठी गेलेल्या विद्यमान सरपंचाला शिवीगाळ करीत घरात घुसून काठीने बेदम मारहाण करण्यात आली तसेच पुन्हा अश्लील शिवीगाळ करीत तुला बघून घेतो अशी धमकी देण्यात आली आहे.

सरपंच यशवंत तुळशीराम पवार यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांना महाड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची पत्नी योजना यशवंत पवार यांनी याबाबत महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

जखमी असलेले विद्यमान सरपंच यशवंत पवार हे शिंदे गटाचे सरपंच असून आरोपी देखील शिवसेना शिंदे गटातील कार्यकर्ते असल्याची माहिती मिळाली आहे.

गुन्हे

आरोपी अरुण शांताराम मुकणे, गणपत शांताराम मुकणे, संदीप सुंदर मुकणे, गणेश पांडू पवार सर्व राहणार खैराट आदिवासी वाडी अशी चारही आरोपींची नावे असून या सर्व आरोपीं विरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे प्रभारी पोलीस अधिकारी विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मुंडे या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत

## परदेशात जाणाऱ्यांसाठी फीव्हर लसीकरण केंद्र सुरू करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

परदेशात नोकरीसाठी जाणाऱ्या व्यक्तींसाठी फीव्हर लसीकरण केंद्र नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे सुरू करण्याची मागणी ऑल इंडिया सीफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियनच्या वतीने युनियनचे अध्यक्ष संजय पवार यांनी नवी मुंबईचे महापौर यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात संजय पवार यांनी म्हटले आहे की, नवी मुंबई येथे उभारण्यात उरण्यात आलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अर्थात स्व. दिनकर बाळू पाटील (दि. बा.पाटील) आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भविष्यात आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी एक महत्त्वाचे केंद्र बनणार आहे. या विमानतळामुळे मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय प्रवासी सीफेरर्स कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच परदेशात नोकरीसाठी जाणारे कामगार प्रवास करणार आहेत. अनेक देशांच्या आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमांनुसार काही देशांमध्ये प्रवास करण्यासाठी यलो फीव्हर लसीकरण अनिवार्य आहे.

सध्या नवी मुंबई परिसरात अधिकृत यलो फीव्हर लसीकरण केंद्र उपलब्ध नसल्यामुळे सीफेरर्स तसेच आंतरराष्ट्रीय प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मर्चट नेव्हीमध्ये कार्यरत हजारो सीफेरर्सना जहाजावर जॉईन होण्यासाठी ही लस अनिवार्य स्वरूपात घ्यावी लागते. नवी मुंबई हे भारतातीत एक महत्त्वाचे मर्चेंट नेव्ही आणि सागरी व्यवसाय केंद्र बनले आहे. त्यामुळे सार्वजनिक हित लक्षात घेता खालीलपैकी कोणत्याही ठिकाणी अधिकृत यलो फीव्हर लसीकरण केंद्र सुरू करण्यात यावे, त्यामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ किंवा नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत असलेल्या शासकीय रुग्णालयात या सुविधेमुळे सीफेरर्स व मर्चट नेव्ही कर्मचारी, परदेशात शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी, आंतरराष्ट्रीय प्रवासी, परदेशात नोकरीसाठी जाणारे कामगार, व्यावसायिक व पर्यटकांना मोठा फायदा होणार आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आज मिष्ठान्न वाटप कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस २ जून रोजी आहे. त्यानिमित्त दैनिक शिवनेरच्या वतीने कॉटन ग्रीन मुंबई येथील अंधशाळेतील विद्यार्थी व कर्मचारी यांना शुक्रवार, दिनांक २२ मे रोजी दुपारी बारा वाजता मिष्ठान्न देण्यात येणार आहे. भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित आमदार प्रमोद जठार हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या संदर्भात बोलताना दै. शिवनेरचे संपादक नरेंद्र विश्वनाथराव वाबळे म्हणाले की, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी अनेक शिक्षण संस्था उभ्या केल्या आहेत. या हाताने दिलेले दुसऱ्या हाताला कळू नये अशी त्यांची दानशूर वृत्ती आहे. रामशेठ यांना उदंड आयुरारोग्य लाभावे अशी आमची ईश्वरचरणी प्रार्थना आहे. म्हणूनच त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त दै. शिवनेरच्या वतीने आम्ही सुग्रास भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

## सिडकोचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष १ जूनपासून होणार कार्यान्वित

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत नागरीक २४/७ तत्त्वावर तक्रारी नोंदवू शकणार पावसाळी कालावधीकरिता सिडको महामंडळाचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष दि. ०१ जून २०२६पासून २४/७ तत्त्वावर कार्यान्वित होणार असून ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत हा कक्ष कार्यान्वित राहणार आहे.

दरवर्षी पावसाळी कालावधीमध्ये सिडकोतर्फे नवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांकरिताआपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येतो. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये उद्‌भवणाऱ्या संभाव्यआपत्ती/दुर्घटना लक्षात घेता सिडकोचा सुसज्ज असा आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यरत असतो. सिडकोचे मुख्यदक्षता अधिकारी, श्री. सुरेश मेंगडे यांनी आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या तयारीचा व या कक्षाच्या माध्यमातूनपार पाडल्या जाणाऱ्या सर्व सेवा व सुविधांचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांनानागरिकांच्या मॉन्सून संबंधित तक्रारींचे वेगाने निराकरण करण्याचे आदेश दिले.

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन इमारतीच्या तळ मजल्यावर असलेला हा नियंत्रण कक्षकार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसहित शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्‌टीच्या दिवशीही २४ तासकार्यरत राहणार आहे. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमनविभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदी महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास संपर्कात असतील.

सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाद्वारे वृक्षांची पडझड/वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांचीछाटणी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूर/पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्तेवा नाल्याजवळ साचलेला कचरा, व्यक्तींचे पाणीसाठ्याच्या ठिकाणी बुडणे, आग व आगीचे विविध प्रकार,साथीचे रोग, विषारी प्राणी चावण्यासंबंधी बाबी, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींचीदखल घेण्यात येऊन त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

नागरिकांनी कोणतीही आपत्ती उद्‌भवल्यास दूरध्वनी अथवा व्हॉटसॲपक्रमांकावर किंवा ई-मेलद्वारे सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून माहिती द्यावी.

## कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राला दापोली विद्यापीठातर्फे पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातर्फे प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जतची 'उत्कृष्ट संशोधन केंद्र' पुरस्कारासाठी निवड झाल्याने दापोलीच्या विश्वेश्वरय्या सभागृहात आयोजित विद्यापीठ वर्धापन दिन सोहळ्यात कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या हस्ते संबंधित केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी. डी. वाघमोडे यांना पुरस्कार देण्यात आला.



प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत हे दिनांक १४ ऑगस्ट १९१९ रोजी स्थापन झालेले ऐतिहासिक केंद्र आहे. या केंद्राने आतापर्यंत भाताच्या १६ सुधारित व ४ संकरित जाती विकसित केल्या आहेत. दरवर्षी ५०० क्विंटलपेक्षा जास्त मूलभूत, पायाभूत, पैदासकार, सत्यतादर्शक बियाणे तयार करून संबंधित बीजोत्पादन संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, अन्य संशोधन केंद्रे व शेतकऱ्यांना पुरविले जाते.येथे भातावरील संशोधन व विस्तार कार्य ही राज्य शासनाची कायमस्वरूपी योजना कार्यरत असून कोंकण व राज्याच्या अन्य विभागासाठी येथून समन्वयाने काम चालते.

या संशोधन केंद्राने पारंपरिक संशोधनाची दिशा बदलवून वातावरणपूरक व शेतकऱ्यांच्या गरजेनुरूप संशोधन, बीजोत्पादन व विस्तार कार्याच्या पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल केला आहे. भात संशोधनामध्ये स्पीड ब्रीडिंग, डिजिटल ब्रीडिंग, जैवतंत्रज्ञान या विविध अद्यावत तंत्रज्ञानाचा उपयोग करून जलद पद्‌धतीने वेगवेगळ्या गुणधर्मासाठी फक्त ६ ते ७ वर्षाच्या कालावधीमध्ये नवीन भात जाती विकसित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे तंत्र विकसित केले आहे. यामध्ये पोहा, मुरमुरे सारख्या उद्योगासाठी आवश्यक वैशिष्ट्यपूर्ण जाती, पौष्टिक गुणधर्म असणाऱ्या जाती, सुगंधित जाती, रोगकिडींना प्रतिकारक, कमी पावसात तग धरणाऱ्या, नैसर्गिक शेतीला योग्य, कमी निविष्ठा, कमी मनुष्यबळ लागणारे पेरभातसारखे भात लागवड तंत्रज्ञान विकसित करण्यात येत आहे. 'स्टे ग्रीन' वाण व संकरित जाती, ज्याचे उत्पादन १० टन प्रती हेक्टरपेक्षा जास्त असेल, असे संशोधन हाती घेतले आहे.केंद्रावर तसेच विद्यापीठ स्तरावर विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यम, फेसबुक, व्हाट्सएप, इन्स्टाग्रामद्वारे तसेच विविध एप्स व रिल्स बनवून करण्यात येत आहे.

अद्ययावत प्रयोगशाळा, आण्विक प्रजनन प्रयोगशाळा, जलद पैदाससारखी राज्यातील पहिली सुविधा, ११२. ४५ कोटींचा प्रस्तावित महाअन्नपूर्णा प्रकल्प, अशा विविध सुविधांची दखल घेत परीक्षक चमूने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील उत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून केंद्राची निवड केली, असे कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी सांगितले.

## महागाव नदीवरील पुलाची उंची वाढविण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्याचा महागाव हा विभाग मोठा असून या विभागातील गावांना जोडणारा तळा -सालशेत -विनवली महागाव कोरखंडे बारपे या रस्त्यावरती महागाव गावाजवळ असणाऱ्या पुलाची उंची वाढविण्याची मागणी प्रवासी व या मार्गावरील नागरिकांतून केली जात आहे.तसेच रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची डागडुजी व रस्त्याचे रूंदीकरण होण्याच्या मागणीला जोर चढत असल्याचे पहावयास मिळत आहे.

तळा ते महागाव बारपे मार्गावरती बहुलेवाडी, महागाव, बारपे, कोरखंडे, म्हसाडी व आदिवासी वाड्या अशी अनेक गावे आहेत. या मार्गावर महागाव गावाजवळून असणाऱ्या नदीवर पुल असून या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात मुसळधार पाऊस पडला की या पुलावर पाणी येत असते पाणी आले की या पुलावरून काही काळ वाहतूक बंद होते.पर्यायाने वाहतूक कोंडी होण्यास सुरुवात होते. या पुलावरून तळा, रोहा, माणगावकडे जाता येते.त्यामुळे नेहमीच अनेक नागरिक या मार्गावरून प्रवास करत असल्याने या पुलाची उंची वाढवावी व कठडे बसवावेत, अशा मागणी करत आहेत



# खालापूर तालुक्यात ऑनलाइन कर वसुली करणारी तांबाटी पहिली ग्रामपंचायत!

### क्यूआर कोड आणि ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

पारदर्शक व सुलभ कारभारासाठी तांबाटी ग्रामपंचायतीने डिजिटल तंत्रज्ञानाचा (क्यूआर कोड आणि ऑनलाइन पोर्टल) वापर करून कर वसुलीत मोठा पुढाकार घेतला आहे.बुधवार दि.२० मे रोजी क्यूआर कोडचे उद्‌घाटन करण्यात आले असून घरोघरी जावून घराच्या दरवाज्यावर लावण्यात आले आहे. नागरिकांना घरबसल्या घरपट्टी व पाणीपट्टी भरणे शक्य झाले असून, गावकऱ्यांचा वेळ वाचणार आहे तसेच करवसुलीचा ताण प्रशासनाचा वाचणार असल्याची प्रतिक्रिया संरपच अविनाश आमले यांनी दिली आहे.



तांबाटी ग्रामपंचायती अनेक योजना तसेच उपक्रम राबविण्यात पुढे असतानाच कर वसुली वाढवण्यासाठी शक्कल लढवत लोटस एजन्सीच्या सहकार्यातून सॉफ्टवेयर तयार करण्यात आले आहे.या क्यूआर कोड तयार करण्यात आले आहे.रायगड जिल्ह्यातील दुसरी तर खालापूर तालुक्यात पहिली ग्रामपंचायत आहे.या क्यू आरकोडचे उद्‌घाटन सरपंच अविनाश आमले, उपसरपंच अरूणा सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सदस्य हरिभाऊ जाधव,संतोष दळवी यांच्या कर्मचारी,ग्रामस्थ उपस्थित होते.तर ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांनी माहिती देताना सांगितले की तांबटी ग्रामपंचायत नाविण्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. ग्रामपंचायतीत कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने पाणीपट्टी आणि घरपट्टी वसुलीसाठी मोठी आडचण असते म्हणूनच क्यूआर कोड आणि ऑनलाइन पोर्टल सुरू केल्यामुळे करवसुलीसाठी मोठी मदत होणार नागरिकांनाही सर्व माहिती उपलब्ध होणारअसून नागरिकांनाही याचा फायदा होणार असल्यामुळे घराच्या उंबरठ्यावर क्यू आर कोड लावण्याचा शुभारंभ केला असून नागरिकांनी कर भरण्यासाठी अवाहन केले आहे.

गावातील नागरिक कामानिमित्ताने बाहेर असतात रविवार सुट्टी असल्यामुळे कर भरता येत नाही मात्र क्यू आर कोडमुळे घरबसल्या किंवा गावाच्या बाहेर राहणाऱ्या नागरिकांना फायदा होणार असल्याचे सरपंच अविनाश आमले यांनी सांगितले.

## सिडको युनियनतर्फे आयोजित नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको बी.सी.एम्प्लॉइज असोसिएशन व सिडको एम्प्लॉईज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने विष्णुदास भावे नाट्यगृह,वाशी येथे सिडकोतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम म्हणून, सामाजिक, वैचारिक नाटक विश्ववंदनीय राजे शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला या नाटकाचा प्रयोग कर्मचाऱ्यांच्यासाठी मोफत ठेवण्यात आला होता.

सदर नाटकाच्या प्रयोगास विष्णूदास भावे नाट्यगृह कर्मचारी प्रचंड गर्दी केली होती. नाटकाच्या मध्यंतराला असोसिएशनचे अध्यक्ष नितीन कांबळे व सिडको अधिकारी यांनी कमिटी सदस्यांचा व पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.नितीन कांबळे यांनी उपस्थितींना वर्षभरातील सामाजिक उपक्रमाविषयी सर्वांना माहिती दिली.

सिडको बी. सी.एम्प्लॉईज असोसिएशनचे अध्यक्ष नितीन कांबळे, उपाध्यक्ष माधुरी माणिककुवर, सुधीर कोळी सरचिटणीस योगेश ठाकूर, चिटणीस धर्मराज व्हटकर, खजिनदार विक्रम गायकवाड तसेच सिडकोतील व्यवस्थापक कार्मिक प्रीतम सिंग राजपूत, महाव्यवस्थापक प्रशांत भांगरे, विशाल ढगे, संतोष उरणकर, विनू नायर,संतोष पळशीकर आदि अधिकारी वर्ग व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुर्भे गावातील विकासकामांना गती

## ■ नगरसेवक दिनेश खानावकर यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील तुर्भे गावात सुरू असलेल्या विविध विकासकामांची माजी सभागृह नेते तसेच विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या सूचनेनुसार नगरसेवक दिनेश खानावकर यांनी गुरुवारी (दि २१) प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. गावकऱ्यांच्या नेमक्या अडचणी, समस्या आणि मागण्या समजून घेण्यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या पाहणीदरम्यान नगरसेवक खानावकर यांनी महापालिकेचे कनिष्ठ अभियंता आणि संबंधित ठेकेदारांसोबत काम सुरू असलेल्या प्रत्येक ठिकाणी भेट देऊन कामाचा सविस्तर आढावा घेतला. रस्ते, गटारे व इतर पायाभूत सुविधांच्या कामात येणाऱ्या अडचणींवर अधिकाऱ्यांशी चर्चा केली. .विकासकाम करताना गावातील नागरिकांच्या सूचनांचा प्रामुख्याने विचार करा.. केलेले काम दर्जेदार झाले पाहिजे आणि ज्या उद्देशाने काम मंजूर झाले तो उद्देश पूर्ण झाला पाहिजे, अशा स्पष्ट आणि कडक सूचना नगरसेवक दिनेश खानावकर यांनी यावेळी उपस्थित अधिकारी व ठेकेदारांना दिल्या.

नागरिकांच्या पैशांतून होणाऱ्या कामात कुठलीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. या पाहणी दौऱ्यावेळी पनवेल तालुका उत्तर मंडळ उपाध्यक्ष समीर गोंधळी, बूथ अध्यक्ष भास्कर तरे, नारायणबुवा भोईर, विक्की भोईर यांच्यासह तुर्भे गावातील स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी आपल्या समस्या थेट नगरसेवकांसमोर मांडल्या. नगरसेवकांच्या या सक्रियतेमुळे तुर्भे गावातील रखडलेली कामे मार्गी लागतील आणि विकासाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



# ९२.४० टक्के गुणांसह सार्थक काळबागे प्रथम

## ■ आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांच्याकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एसएससी (दहावी) परीक्षेच्या नुकत्याच घोषित झालेला निकालात पंचक्रोशी विद्यालय (बोरगाव) शाळेचा विद्यार्थी सार्थक काळबागेने ९२.४० टक्के गुण संपादन करून शाळेत प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सार्थक काळबागे हा आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे यांचा पुतण्या असून त्याच्या यशाबद्दल त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.





यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सार्थकचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास व जिद्दीच्या जोरावर मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. तसेच भविष्यातही सार्थकने याच जिद्दीने प्रगती करीत आपल्या कुटुंबासह शाळेचे व परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या. सार्थकच्या यशाबद्दल परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रश्मी नांदेडकर यांनी स्वीकारला परिमंडळ ३चा कार्यभार

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ३चा पदभार नुकताच उपायुक्त डॉ. रश्मी नांदेडकर यांनी स्वीकारला. यावेळी विविध अधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या, तर परिमंडळ १ची जबाबदारी विजय खरात यांच्याकडे देण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त भारंबे यांनी महिला अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यावर भर दिल्याचे यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे. नांदेडकर यापूर्वी विशेष शाखेत कार्यरत होत्या.



पनवेल : उत्तर रायगड भाजपमध्ये संघटनात्मक नियुक्त्यांची घोषणा नुकतीच करण्यात आली. यामध्ये कामगार आघाडी जिल्हा संयोजकपदी रवींद्र नाईक यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि नगरसेवक परेश ठाकूर यांनी रवींद्र नाईक यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी रवींद्र कोरडे, पांडुरंग पाटील, ॲड. महादेव खेरडे, उपेंद्र मराठे, मधुकर उरणकर, राजपाल शेगूकर, रवी रत्नपारखे आदी उपस्थित होते.

## निवडक

### गाडीची काच फोडून चोरी

**नवीन पनवेल :** पार्क केलेल्या कारची काच फोडून ४५ हजार रुपये रोख रक्कम आणि हिशेबाची डायरी अज्ञात चोराने चोरून नेली. याप्रकरणी आता खारघर पोलीस ठाण्यात २० मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवेंद्र कुमार बिंदेश्वरी हे तळोजा फेस वन येथे राहत असून २० मे रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास निळकंठ स्वीटच्या समोरील रस्त्यावर सेक्टर २० येथे त्यांनी आपली क्रेटा कार पार्क केली होती. दरम्यान, या कारची डाव्या बाजूची दरवाजाची काच फोडून चोराने सॅकमध्ये असलेली ४५ हजार रुपये रोख रक्कम आणि हिशेबाची डायरी चोरून नेली. या घटनेमुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.

### बीअरच्या बाटलीने मारहाण

**नवीन पनवेल :** पूर्वीच्या घटनेचा राग मनात धरून २७ वर्षीय तरुणाच्या डोक्यात बीअरची बाटली मारून इतर मित्रांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा प्रकार नुकताच कामोठे येथे घडला. या प्रकरणी रोशन सुर्वे (राहणार, करंजाडे) आणि इतर सात अनोळखी इसमांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २० मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील जखमी फिर्यादी रोहित अशोक कोळेकर (राहणार, कोपरा गाव, खारघर) हा जेवणाचे पार्सल घेऊन हॉटेलमधून बाहेर पडला. यावेळी रोशन सुर्वे याने फिर्यादीच्या डोक्यात बीअरची बाटली मारली आणि त्याच्यासोबत असलेल्या सात इसमांनी रोहितला शिवीगाळ करून मारहाण केली. यात रोहित गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.

### अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे

**नवीन पनवेल :** १० वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी दीपक जाना पालेकर (राहणार, वळवली गाव) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २० मे रोजी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराबद्दल स्थानिक नागरिकांकडून निषेध व्यक्त केला जात आहे. आरोपी दीपक पालेकर याने अल्पवयीन पीडित मुलगी दुकानात गेली असताना तुला काहीतरी दाखवतो असे सांगून तिला मंदिराजवळ घेऊन गेला आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले. याबाबत कोणाला न सांगण्याची धमकी दिली. हा प्रकार १९ मे रोजी दुपारी दीडच्या सुमारास घडला. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करीत आहेत. या घटनेमुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.

### महिलेची फसवणूक

**पनवेल :** महिलेसोबत रिलेशनशिपमध्ये राहून पोलीस असल्याचे भासवले आणि तिची दिशाभूल केल्याप्रकरणी अच्युतराव प्रकाश जावीर (३५, रा. पनवेल) नावाच्या इसमाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेसोबत जावीरने ओळख करून प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर आपला घटस्फोट झाल्याचे सांगून महिलेबरोबर रिलेशनशिपमध्ये राहून दोघांनी लग्नही केले. त्यानंतर आपली फसवणूक केल्याप्रकरणी महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

## मनसे नेते संदीप देशपांडेंच्या टीकेला राष्ट्रवादीचे शिवदास कांबळे यांचे प्रत्युत्तर

**पनवेल : बातमीदार**

मनसेचे मुंबईतील नेते संदीप देशपांडे यांनी पनवेलमध्ये येऊन तटकरे कुटुंबावर तोंडसुख घेतले. यावर पनवेल येथील राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक तथा पक्षाचे जिल्हा समन्वयक शिवदास कांबळे यांनी बाहेरून येणाऱ्या आणि टीका करणाऱ्या नेत्यांची नोंद घ्यावी, असे आम्हाला वाटत नसल्याचे सांगत देशपांडे यांना प्रत्युत्तर दिले आहे.

राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे यांनी म्हटले आहे की, रायगड जिल्ह्यात आल्यानंतर खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका करणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, तटकरेसाहेब जिल्ह्याचे पालकमंत्री असताना संपूर्ण रायगडात काय विकास झालाय ते जगजाहीर आहे. पायाभूत सुविधा निर्माण करण्यामध्येही तटकरेसाहेबांचा सिंहाचा वाटा राहिला आहे हे येथील जनता विसरणार नाही.

याचबरोबर आमच्या नेत्या व राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी संपूर्ण देश कोविडच्या महामारीमध्ये अडकला होता त्या वेळेला लोकांचा जीव वाचवण्याचे अतुलनीय काम केले आहे. कोविडबाधित रुग्णांसाठी विशेष रुग्णालये, बेड, ऑक्सिजन व औषध पुरवठा तसेच क्वारंटाईन सेंटरची उभारणी, अन्य सुविधा यामध्ये स्वतः जीवाची पर्वा न करता काम केले आहे. ते लक्षात घेता बाहेरून येणाऱ्या आणि टीका करणाऱ्या नेत्यांची नोंद घ्यावी, असे आम्हाला वाटत नसल्याचे राष्ट्रवादीचे नेते कांबळे यांनी मनसेचे देशपांडे यांना सुनावले आहे.

## पुरुषोत्तम मास अनुष्ठानाला प्रारंभ

**पनवेल : बातमीदार**

येथील प्रसिद्ध विरुपाक्ष मंदिरात अधिक मासानिमित्त पुरुषोत्तम मास अनुष्ठानाला प्रारंभ झाला आहे. १७ मे ते १५ जून या कालावधीत हे अनुष्ठान संपन्न होणार आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अनुष्ठान कालावधीमधे दररोज सकाळी ७.३० वाजता विविध भाविकांच्या हस्ते "श्रीराधापुरुषोत्तम" पूजन संपन्न होत आहे. सायंकाळी ७ वाजता सामूहिकरित्या महालक्ष्मी अष्टक व विष्णूसहस्रनाम पठण आणि रात्री युवा कीर्तनकार वर्षा रानडे-सहस्रबुद्धे यांचे कीर्तन संपन्न होत आहे. कीर्तनातील पूर्वरंगामध्ये श्रीमद्भगवतगीतेवर निरुपण आणि उत्तररंगात श्रीमद्भागवत ग्रंथातील कथा सांगितल्या जात आहेत. कीर्तनाला धनंजय सोमण यांची संवादिनी व गणेश घाणेकर आणि शार्दूल डोंगरे यांची तबलासाथ आहे. भाविकानी या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून भगवत्भक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विरुपाक्ष मंदिर न्यासाच्या वतीने करण्यात आले आहे.



# हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याकरिता ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिवहन विभागामार्फत वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याकरिता देण्यात आलेली मुदत नागरिकांच्या सोयीसाठी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या १४ ऑगस्ट २०२५ च्या परिपत्रकानुसार ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे. याची सर्व वाहनधारकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी केले आहे.




वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असून वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करण्यासाठी वाहनांची ओळख पटवणे, नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असून या निर्देशांची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

ज्या वाहनधारकांची वाहने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित झालेली आहेत अशा सर्व वाहनधारकांनी परिवहन विभागाच्या https: transport.maharashtra.gov.in, या संकेतस्थळावर जाऊन त्याबाबत नोंदणी करावी. या कामासाठी परिवहन विभागाने अधिकृत कंपन्यांची नेमणूक केली असून त्यांच्यामार्फतच हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. इतर अनधिकृत विक्रेत्यांकडून नंबर प्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये होणार नाही. याविषयी काही शंका अथवा तक्रारी असल्यास परिवहन विभागाच्या पोर्टलवर अथवा dytccomp.tpt-mh@gov.in, या ई-मेलवर संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.

तसेच नागरिकांच्या सोयीसाठी एका ठिकाणी किमान २५ किंवा २५ पेक्षा जास्त दुचाकी, चारचाकी, ऑटोरिक्षा, टॅक्सी, बस तसेच ट्रक मालकांनी HSRP बसविण्यासाठी अर्ज केल्यास त्यांच्या सोयीच्या ठिकाणी किंवा हौसिंग सोसायटीमध्ये संबंधित एजन्सीमार्फत कोणतेही अतिरिक्त होम फिटमेंट शुल्क न आकारता HSRP बसविण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

# सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकावर मॉकड्रील

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

स्थानकाचा ताबा घेणे व बॉम्ब ठेवल्याची धमकीसारख्या आपत्कालीन प्रसंगांना सामोरे जाण्याची सिद्धता तपासण्याकरिता नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधरवरील सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकावर व्यापक आपत्कालीन प्रतिसाद मॉक ड्रील २० मे रोजी पार पडले. नवी मुंबई पोलिसांचे शीघ्र प्रतिसाद दल व स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून सदर मॉक ड्रील पार पाडण्यात आले.

संघटनांतर्गत समन्वय, प्रतिसाद कार्यक्षमता, निर्वासन प्रक्रिया, दळणवळण शिष्टाचार व मेट्रो स्थानकांवरील सुरक्षाविषयक आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्याची सिद्धता या बाबींचे मूल्यमापन करून बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने मॉक ड्रील पार पडले.

मॉक ड्रीलदरम्यान स्थानकाचा अनधिकृतरीत्या ताबा घेणे व स्थानकावर स्फोटक वस्तू ठेवल्याचा संशय, या परिस्थितीचे सदृशीकरण करण्यात आले. आपत्कालीन प्रतिसाद कार्यान्वित झाल्यावर प्रशिक्षित जवानांनी प्रवाशांना सुखरूप बाहेर काढणे, स्थानक विलगीकरण, धमकीची सत्यता पडताळून पाहणे प्रतिसाद उपाययोजना राबविण्यास सुरूवात केली.

मॉक ड्रीलदरम्यान पोलीस कर्मचारी आणि मेट्रो कर्मचाऱ्यांसह क्यूआरटी टीमने जलद हालचाल आणि एककालिक कार्यकारी प्रतिसाद यांचे प्रात्यक्षिक केले. या ड्रील अंतर्गत आपत्कालीन दळणवळण प्रणाली, प्रवेश नियंत्रण उपाययोजना कार्यान्वित करणे आणि वैद्यकीय व आपत्कालीन प्रतिसाद पथकांबरोबर समन्वय साधणे यांचा समावेश होता.

या वेळी उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकारी, क्यूआरटी टीम, सिडको आणि महा मेट्रोचे अधिकारी यांनी सहभागी दलांनी दाखवलेल्या व्यावसायिक कौशल्य व त्वरित प्रतिसाद याबद्दल त्याची प्रशंसा केली. या मॉक ड्रीलद्वारे कार्यकारी सिद्धता पडताळण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रवासी आणि पायाभूत सुविधा सुरक्षेकरिता कराव्या लागणाऱ्या आपत्कालीन उपाययोजनांमध्ये सुधारणा करण्यास मदत झाली.

सुरक्षाविषयक आव्हानांचा सामना करण्याकरिता लागणाऱ्या उच्चस्तरीय सिद्धतेसह, मेट्रो प्रवाशांच्या मनामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास अशा प्रकारची मॉक ड्रील उपयुक्त असल्याचे मत उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

## शिवमंदिरात चोरीचा प्रयत्न; नागरिकांनी चोराला रंगेहाथ पकडले

**पनवेल : वार्ताहर**

धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून पनवेलच्या लाईन आळी परिसरातील एका जुन्या आणि जागृत शिवमंदिरात चोरीचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमाला नागरिकांनी रंगेहाथ पकडल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार नेहमीच्या वर्दळीच्या वेळी एका अज्ञात व्यक्तीने मंदिराच्या गर्दीचा गैरफायदा घेत गाभाऱ्यात प्रवेश केला. नंदीच्या मूर्तीजवळ आणि दानपेटीत भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेले पैसे चोरण्याचा या इसमाने प्रयत्न केला.



दरम्यान, हे कृत्य करीत असतानाच सजग भाविकांच्या ही बाब लक्षात आली. त्यांनी तातडीने चोराला पकडून त्याच्या हालचालींवर नियंत्रण मिळवले. या घटनेमुळे परिसरात नागरिक आणि भाविकांची मोठी गर्दी जमली होती. पवित्रस्थळी अशा प्रकारचे कृत्य घडल्याने उपस्थित नागरिकांमध्ये संतापाची भावना दिसून येत होती.

## संपादकीय

# संस्कृती आणि विकृती यांचा संघर्ष

आजचे संकट सरकारमुळे किंवा कोणा नेत्यामुळे निर्माण झालेले नसून जागतिक परिस्थिती हे त्याचे कारण आहे. असे असताना केवळ राजकीय चिखलफेकीसाठी या संकटाची संधी साधली तर तो स्वार्थीपणा ठरेल. त्यामध्ये देशाचे कोणतेही हित नाही!

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १५ ते २० मे २०२६ या पाच दिवसांतील पाच देशांच्या विदेश दौऱ्यात भारतात आणि जगात बरेच काही घडून गेले. पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेले ऊर्जासंकट आणि जागतिक महासत्तांची नियंत्रणे अशा दुहेरी ओझ्यातून भारतास बाहेर काढून दीर्घकालीन स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट गाठण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून मोदी यांच्या विदेश दौऱ्याकडे जगभरातील नेते उत्सुकतेने पाहात असताना इकडे भारतात मात्र, मोदी यांना दूषणे देत त्यांच्यावर गलिच्छ टीकेची राळ उठविणारे राजकारण सुरू झाले होते, ही लाजीरवाणी बाब आहे. संयुक्त अरब अमिराती, नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या देशांच्या नेत्यांनी भारताच्या वाढत्या जागतिक भूमिकेचे आणि मोदी यांच्या नेतृत्वाचे अनेक ठिकाणी कौतुक केले. भारत हा 'विश्वसनीय भागीदार' आहे असे गौरवोद्गार काही नेत्यांनी काढले, तर काही देश भारताकडे 'रणनीतिक मित्र' आणि 'उदयोन्मुख जागतिक शक्ती' म्हणून पाहात असल्याचा सूरदेखील या काळात जगाच्या कानावर पडला. विशेषतः इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांनी मोदी यांच्या भेटीनंतर भारत–इटली संबंधांची नवी उंची गाठण्याचा व भारतासोबत विशेष धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्याचा संकल्प बोलून दाखविला. उभय देशांमधील संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार आणि जागतिक सुरक्षेतील सहकार्य अधिक दृढ करण्यावरही त्यांनी भर दिला. संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष मोहंमद बिन झायेद यांनी भारत–अमिरात संबंध म्हणजे 'समावेशक धोरणात्मक भागीदारी' असल्याचा उल्लेख करून भारतासोबत ऊर्जा सुरक्षा, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि प्रादेशिक स्थैर्य यांवर काम करण्याची भूमिका मांडली, तर नेदरलँड्सच्या पंतप्रधानांनी भारताला सेमीकंडक्टर, स्वच्छ ऊर्जा आणि जलव्यवस्थापन क्षेत्रातील महत्त्वाचा भागीदार संबोधले. स्वीडन आणि नॉर्वे या देशांनी भारतासोबत हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवतंत्रज्ञान आणि संरक्षण सहकार्य वाढवण्यास प्राधान्य दिले. भारत हा 'लोकशाही मूल्यांवर आधारित विश्वासार्ह भागीदार' देश आहे, असाच सूर नॉर्डिक शिखर परिषदेत उमटत होता, तेव्हा इकडे भारतात मात्र वैफल्य आणि नैराश्याने ग्रासलेल्या काही नेत्यांमध्ये मात्र पंतप्रधान मोदी यांच्यावर गलिच्छ आरोपांची चढाओढ लागली होती. रायबरेली येथे काँग्रेस कार्यकर्त्यांसमोर बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी यांना उद्देशून वापरलेला 'गद्दार' हा शब्दप्रयोग जागतिक नेत्यांकडून व्यक्त होणाऱ्या आदरभावनेस छेद देणारा आहेच, पण सभ्यतेच्या संस्काराचा अभाव दर्शविणारादेखील आहे. या गलिच्छ राजकारणाच्या पार्श्वभूमीवर, राहुल गांधी यांच्या सुरात सूर मिसळून त्यांची री ओढणाऱ्या काही प्रभावहीन नेत्यांना फटकारून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी घेतलेली सकारात्मक भूमिका सभ्य व सुसंस्कृत ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशहिताचे व देशाची प्रतिमा उंचावणारे काम करत आहेत, अशा शब्दांत शरद पवार यांनी या गलिच्छ राजकारणास दाखविलेला आरसा ही या घडामोडीतील दिलासादायक बाजू ठरते. राजकारणात विरोधकांनी सरकारवर टीका करावी, आरोपही करावेत, तो त्यांचा राजकीय हक्क आहे, पण देशहिताच्या व्यापक मुद्द्यावर आणि विशेषतः जगातील अनेक देश भारताकडे आदरभावाने पाहात असताना आपल्याच देशात प्रतिमाभंजनाचे राजकारण होत असेल तर त्यासाठी ही वेळ नाही, हे लक्षात घ्यावे लागेल.**

# काळाच्या वाळूवर उमटलेली गाथा : इतिहासाच्या पाऊलखुणा





इतिहास हा नुसता तारखांचा तक्ता नसतो. तो काळाच्या अफाट वाळवंटावर उमटलेल्या पाऊलखुणांचा मागोवा आहे. या खुणा कधी दगडावर कोरलेल्या असतात, कधी मातीत गाडलेल्या, तर कधी माणसांच्या मनात जपलेल्या. त्या आपल्याला सांगतात की आपण काल कोण होतो, आज कोण आहोत आणि उद्या कोण होऊ शकतो. या पाऊलखुणा शोधणे म्हणजे आपल्या असण्याचा अर्थ शोधणे होय.

**सह्याद्रीच्या कड्यांवरचा स्वाभिमान : गडकिल्ल्यांची गाथा**

महाराष्ट्राच्या भूमीवर उभा असलेला प्रत्येक किल्ला ही स्वाभिमानाची एक भव्य पाऊलखूण आहे. रायगडाच्या महाद्वारातून आत शिरलो की शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाचा डंका आजही ऐकू येतो. तिथली नगारखान्याची जागा, राजदरबार, जगदीश्वर मंदिर प्रत्येक दगडातून एक काळ बोलतो. सिंहगडाच्या कड्यांवर तानाजी मालुसरेंचे 'गड आला पण सिंह गेला' हे बलिदान अजूनही कोरलेले आहे.

प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखानाच्या कबरीशेजारी उभे राहिले की शिवरायांच्या मुत्सद्देगिरीची साक्ष पटते. हे किल्ले केवळ दगड–मातीचे ढीग नाहीत. ते स्वराज्याच्या संकल्पनेची, स्वातंत्र्याच्या लढ्याची आणि मावळ्यांच्या निष्ठेची पाऊलखूण आहे. आजही या गडांवर जाणारा प्रत्येक तरुण आपसूकच ताठ मानेने चालू लागतो, कारण त्या मातीत पराक्रमाची खूण आहे.

**लेण्यांच्या गर्भात दडलेली संस्कृती : अजिंठा–वेरूळचे गूढ**

अजिंठा आणि वेरूळची लेणी ही केवळ पर्यटनस्थळे नाहीत, तर दोन हजार वर्षांपूर्वीच्या भारतीय कलेचा आणि श्रद्धेचा ठेवा आहे. अजिंठ्याच्या भिंतींवरचे चित्र म्हणजे रंगातून सांगितलेला बुद्धाचा जीवनपट आहे. वेरूळचे कैलास लेणे हे तर मानवी कल्पकतेचा कळस. एकसंध दगडात वरून खाली कोरून काढलेले हे मंदिर पाहताना माणूस थक्क होतो.

ही पाऊलखूण सांगते की आपले पूर्वज केवळ योद्धे नव्हते, तर कलाकार, शिल्पकार आणि सौंदर्योपासकही होते. हजारो कारागिरांनी शेकडो वर्षे खपून ही निर्मिती केली. त्यांच्या छन्नीचे घाव आजही आपल्याला तत्कालीन समाज, वेशभूषा, दागिने आणि जीवनपद्धतीची ओळख करून देतात.

**मातीच्या थरांखालचा भूतकाळ : पुरातत्वाची साक्ष**

जुन्नर, इनामगाव, दैमाबाद येथील उत्खननात सापडलेली मातीची खापरे, तांब्याची हत्यारे, बांगड्या, मणी या सगळ्या गोष्टी सातवाहनांपासून चालुक्यांपर्यंतच्या संस्कृतीची पाऊलखूण आहे. सोपारा आणि चौल येथे सापडलेली रोमन नाणी सांगतात की दोन हजार वर्षांपूर्वीच आपला व्यापार अरबस्तान आणि युरोपपर्यंत पोहोचला होता.

ही मातीतली पाऊलखूण फक्त वस्तू नसते. ती आपल्या तंत्रज्ञानाची साक्ष असते. लोखंड वितळवणे, कापड विणणे, जहाज बांधणे या कला आपल्याकडे तेव्हाच विकसित झाल्या होत्या. आजच्या 'मेक इन इंडिया'चा पाया तेव्हाच घातला गेला होता, हे या खुणा सांगतात.

**अभंग–ओव्यांतून जिवंत राहिलेला इतिहास : लोकपरंपरेचा ठेवा**

काही पाऊलखुणा कागदावर नाहीत, तर लोकांच्या कंठात आहेत. ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', तुकारामांचे 'अभंग', रामदासांचे 'मनाचे श्लोक' हा आपला वैचारिक इतिहास आहे. 'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले' ही शिकवण आजही सामाजिक समतेचा मंत्र देते.

पोवाडे, भारुडे, लावण्या, जागरण–गोंधळ या लोककला इतिहासाला जिवंत ठेवतात. शाहिरांनी आपल्या पोवाड्यांतून शिवछत्रपतींचा पराक्रम घराघरात पोहोचवला. आजीच्या तोंडून ऐकलेली गोष्ट, लग्नात म्हटले जाणारे उखाणे, बाळाला झोपवताना गायली जाणारी अंगाई या सगळ्यातून पिढ्यानपिढ्यांचा इतिहास पुढे सरकतो. हा कागदावर न नोंदवलेला, पण काळजावर कोरलेला इतिहास आहे.

**बलिदानातून जन्माला आलेला स्वातंत्र्याचा मार्ग**

इतिहासातील काही पाऊलखुणा रक्ताने लिहिलेल्या आहेत. चाफेकर बंधू, हुतात्मा बाबू गेनू, वासुदेव बळवंत फडके यांच्या बलिदानातून स्वातंत्र्याचा मार्ग तयार झाला. आगाखान पॅलेस आणि येरवडा तुरुंगाच्या भिंतींनी गांधीजींचा सत्याग्रह पाहिला आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा ही तर आपल्या अगदी जवळची पाऊलखूण. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानातून मुंबईसह महाराष्ट्र मिळाला. हुतात्मा चौकातील अखंड तेवणारी ज्योत आजही त्या त्यागाची आठवण करून देते. ही पाऊलखूण सांगते की भाषा आणि अस्मितेसाठी माणूस प्राणही देऊ शकतो.

**उद्याच्या इतिहासाची सुरुवात : आपली जबाबदारी**

इतिहासाच्या पाऊलखुणा फक्त मागे वळून पाहण्यासाठी नसतात, तर पुढचा रस्ता ठरवण्यासाठी असतात. आज आपण जे करू, तेच उद्याच्या पिढीसाठी इतिहास बनेल. आपण पर्यावरण जपले की नाही, समाजात समता नांदवली की नाही, ज्ञान–विज्ञानात काय भर घातली यावरून उद्याचा इतिहास आपली नोंद घेईल.

म्हणूनच जुने वाडे, मंदिरे, गढ्या जपल्या पाहिजेत. कारण एक वाडा पडला की त्याच्यासोबत शंभर वर्षांच्या आठवणीही मातीत मिसळतात. गावातील जुन्या जाणत्या माणसांच्या गोष्टी ऐका. कारण त्यांच्या आठवणीत असा इतिहास दडलेला असतो जो कुठल्याही पुस्तकात सापडणार नाही.

**पाऊलखुणांवरून पुढे...**

इतिहासाच्या पाऊलखुणा आपल्याला भूतकाळात अडकवत नाहीत, तर भविष्याचा वेध घ्यायला शिकवतात. शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य आज कॉर्पोरेट जगात शिकवले जाते. संतांची शिकवण आजच्या धावपळीच्या जीवनात मनःशांती देते.

या खुणा पुसल्या तर आपण वाट चुकू. त्या जपल्या, समजून घेतल्या, तर आपला प्रवास अधिक अर्थपूर्ण होईल. कारण शेवटी इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपणच असतो. आपल्या पूर्वजांनी टाकलेल्या पावलांवरून चालत आपल्याला नवी पाऊलखूण उमटवायची आहे अशी की येणाऱ्या पिढ्या अभिमानाने म्हणतील, 'हा आमचा वारसा आहे.' इतिहासाच्या या पाऊलखुणा शोधा, जपा आणि पुढे चालत राहा. कारण त्यातच आपले खरे अस्तित्व दडले आहे. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# मोटोरोला रेझर फोल्ड प्रीमियम स्मार्टफोन लॉँच

टेक कंपनी मोटोरोलाने भारतात आपला सर्वात प्रीमियम फोल्डेबल स्मार्टफोन मोटोरोला रेझर फोल्ड लॉन्च केला आहे. याची सर्वात मोठी खासियत म्हणजे याचा ८.१–इंचचा फोल्डेबल डिस्प्ले आणि लेटेस्ट स्नॅपड्रॅगन ८ जेन ५ प्रोसेसर आहे.हा फोन ५० मेगापिक्सलच्या तीन रियर कॅमेऱ्यांसह आला आहे. मोटोरोलाने हा रेझर फोल्ड दोन स्टोरेज व्हेरिएंट आणि एका स्पेशल एडिशनसह बाजारात आणला आहे. लॉन्च ऑफरमध्ये १०,००० रुपयांचा इन्स्टंट बँक डिस्काउंट किंवा एक्सचेंज बोनस मिळेल तसेच १८ महिन्यांपर्यंत नो–कॉस्ट EMIचा पर्यायदेखील आहे. २० जूनपर्यंत फोन खरेदी करणाऱ्यांना एक वर्षासाठी 'फ्री वन–टाइम स्क्रीन रिप्लेसमेंट'ची सुविधा मिळेल.



मोटोरोला रेझर फोल्डचे डिझाइन खूप प्रीमियम आणि स्लीक आहे. उघडल्यावर त्याची जाडी फक्त ४.५५mm राहते, ज्यामुळे ते पकडताना खूप हलके वाटते.फोन बनवण्यासाठी उच्च–श्रेणीचे अॅल्युमिनियम आणि काच वापरले आहे. त्याचे वजन २४३ ग्रॅम आहे. मागील पॅनलवर प्रीमियम पोत (टेक्सचर) दिले आहे, जे हातात चांगली पकड देते.समोरच्या बाजूला कव्हर डिस्प्लेसह पातळ बेझल्स दिले आहेत. दुमडल्यावर ते खूप कॉम्पॅक्ट होते.

बटणे आणि पोर्ट्स : यात टाइप–सी चार्जिंग पोर्ट, सिम ट्रे आणि स्पीकर ग्रिल खालच्या बाजूला आहेत. पॉवर बटणामध्येच फिंगरप्रिंट सेन्सर दिला आहे.पाणी आणि धुळीपासून संरक्षणासाठी याला IP४८ आणि IP४९ रेटिंग मिळाली आहे.

मुख्य डिस्प्ले : ८.१–इंच LTPO एक्सट्रीम एमोलेड पॅनल, २K रिझोल्यूशन (२४८४ x २२३२ पिक्सेल). यात १२०Hz रिफ्रेश रेट आणि ६२०० निट्सची पीक ब्राइटनेस मिळते.

कव्हर डिस्प्ले : ६.६–इंचची स्क्रीन आहे जी १६५Hz रिफ्रेश रेट आणि ६००० निट्स ब्राइटनेसला सपोर्ट करते. दोन्ही डिस्प्लेवर डॉल्बी व्हिजनचा सपोर्ट आहे.

मागील कॅमेरा : ५०MP सोनी LYTIA ८२८ प्रायमरी सेन्सर, ५०MP अल्ट्रावाइड आणि ५०MP सोनी LYTIA ६०० पेरिस्कोप टेलीफोटो लेन्स (उत्तम झूमसाठी). हे ८K व्हिडिओ रेकॉर्डिंगला सपोर्ट करते.सेल्फी कॅमेराः फोल्ड केल्यावर बाहेर २०MP आणि उघडल्यावर आतमध्ये ३२MPचा कॅमेरा दिला आहे.

# समाजसुधारक राजा राममोहन रॉय

## निमित्त



आधुनिक भारतातील अग्रगण्य धर्मसुधारक व ब्राह्मो समाजाचे संस्थापक म्हणजे राजा राममोहन रॉय. त्यांचा जन्म पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगरी या गावी २२ मे १७७२ रोजी झाला. कृष्णचंद्र बंदोपाध्याय हे त्यांचे प्रतितामह बंगालमधील नवाबाच्या नोकरीत होते. नवाबाच्या दरबाराने 'राय' ही सन्मानदर्शक पदवी त्यांना दिली. त्यांचे पितामह ब्रजविनोद रॉय यांनी नवाबाची नोकरी सोडून दिली. रामकांत रॉय यांच्या कुळात वैष्णव संप्रदात होते. .

राममोहन यांचे बंगाली, फार्सी व संस्कृत या तीन भाषांचे प्राथमिक अध्ययन घरीच झाले. वयाच्या अठराव्या वर्षी ते बिहारमधील पाटणा येथे अरबी आणि फार्सी यांच्या शिक्षणासाठी गेले. कुराणाचाही त्यांनी अभ्यास केला. मुल्ला व मौलवी त्यांचा अरबी, फार्सी पांडित्याने विस्मित होत. इस्लाम धर्मातील आणि सूफी संप्रदायातील त्यांची पारंगतता पाहून माता–पित्यांनी संस्कृत अध्ययनासाठी त्यांची वाराणसीला रवाना केले. श्रुती स्मृती–पुराणांचा, कुराणाचा आणि बायबलचा सखोल अभ्यास त्यांनी केला. वयाच्या सोळाव्या वर्षी ते आपल्या गावी परतले.

राममोहन यांनी आपले मूर्तिपूजाविरोधी विचार आपल्या पित्याला व मातेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र मतभेदामुळे राममोहन यांना घर सोडावे लागले. त्यांनी भारतभर प्रवास केला. बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी ते तिबेटमध्ये गेले.

१९७०मध्ये स्वगृही परतल्यावर राममोहन यांच्या माता–पित्यांचा रागही निवळला होता, परंतु माता–पित्यांची त्यांनी निराशा केली. त्यांची मूर्तिपूजाविरोधी व बहुदेवतावादविरोधी मते अधिकच ताठर व कणखर बनली होती. भोवतालच्या समाज सनातनी व रूढिनिष्ठ असल्याने त्यांचा द्वेष करू लागला. पिताजींनी त्यांना घराबाहेर काढले.

तत्कालीन रीतीला अनुसरुन राममोहनांचे बालपणीच पहिले लग्न झाले होते. प्रथम पत्नीच लवकरच निवर्तल्यामुळे वडिलांनी १७८१ व १७८२ साली त्यांची दोन लग्ने लावून दिली. १८०० साली त्यांना पुत्रप्राप्ती झाली. पुत्राचे नाव राधाप्रसाद असे ठेवले. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्याने घरची सांपत्तिक स्थिती ठीक असूनही त्यांना सरकारी नोकरी पत्करावी लागली. १८०३मध्ये डाक्का येथील कलेक्टर टॉमस वुडफर्ड याचे दिवाणपद स्वीकारले. याच सुमारास राममोहनांनी ग्रंथलेखनास सुरुवात केली. फार्सी भाषेत त्यांनी 'ईश्वरभक्तांस देणगी' (तुहफास–उल्–मुवहिद्दीन) या अर्थाच्या शीर्षकाखाली एक निबंध प्रसिद्ध केला.

१८१८ साली सतीची प्रथा बंद व्हावी म्हणून समाजातील प्रतिष्ठित मंडळीच्या सह्यांसह एक अर्ज त्यांनी सरकारकडे पाठवला. ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा जाहीर झाला. आपल्या धर्मविषयक व ईश्वरविषयक उदार तत्त्वज्ञानाचा व उपासनापद्धतीचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्राह्म समाजाची (ब्राह्मो समाजाची) स्थापना केली. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टल येथे त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# आंब्याच्या कोयीचेही आरोग्यदायी फायदे

उन्हाळ्याचा सीझन सुरू झाला की सर्वत्र बाजारपेठांमध्ये आंब्याचा घमघमाट पसलेला असतो. चवीला गोड तसेच रसाळ असणाऱ्या आंब्याला जगभरात प्रचंड मागणी आहे. पण आंब्याचा गर खाऊन लोक त्याची कोय फेकून देतात. परंतु आंबाचे शरीराला जितके फायदे आहेत, तितकिच त्याची कोयही गुणकारी मानली जाते.



आंब्याच्या कोयमध्ये अनेक नैसर्गिक घटक आढळतात. व्हिटॅमिन, मिनिरल्स तसेच अँटि–ऑक्सिडंट्स गुणांनी परिपूर्ण असणारी आंब्याची कोय शरीरासाठी फायदेशीर आहे.

केसांतील कोंडा कमी होतो– केसांमधील कोंडा ही एक मोठी समस्या आहे. फक्त हिवाळ्यातच नाही तर उन्हाळ्यात देखील केसांमध्ये कोंडा होण्याची समस्या उद्भवू शकते.

आंब्याच्या कोयीपासून बनवलेलं पेस्ट केसातील कोंडा नाहिसा करण्यासाठी उपयुक्त ठरतं. हे पेस्ट केसांवर तसेच टाळूवर हळूवारपणे लावावं. त्यानंतर काही वेळानंतर केस पाण्याने धुवावे. हे पेस्ट केसांना लावल्यामुळे केस मऊ आणि चमकदार बनतात.

१) सुरुवातीला आंब्याच्या काही कोय एकत्र करून घ्या.

२) या कोयींच्या वरचा भाग पूर्णपणे काढून त्याच्या आतील पांढरी बी काढा.

३) या बिया मिक्समध्ये बारीक करून घ्याव्या.

४) हे मिश्रण रायच्या तेलामध्ये एकजीव करावं आणि ही पेस्ट केसांवर अप्लाय करावी.

कोलेस्ट्रोल कंट्रोल होण्यास मदत – आंब्याच्या कोयीमुळे शरीरातील बॅड कोलोस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. आंब्याच्या कर्नेल पावडरचे सेवन केल्याने खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते आणि रक्तातील साखरेची पातळी देखील नियंत्रित राहते. या कोयीच्या पावडरपासून शरीरातील रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते, असं तज्ञ सांगतात. यासाठी आंब्याची कोय नीट वाळवून बारीक करून त्याची बारीक पावडर बनवा. एक ग्लास पाण्यात एक चम्मच पावडर मिसळून त्याचं सेवन करावं. त्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते.

वजन होईल कमी– वजन कमी करण्यासाठी आंब्याची कोय उपयुक्त ठरते. यामुळे मेटाबॉलिक रेटमध्ये वाढ होऊन, पोटावरील चरबी कमी होते.

# खासदार सुनील तटकरेंच्या आदेशानंतर रोहा-तांबडी रस्त्याच्या कामाला सुरुवात

## जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी केली पाहणी

**रोहा : प्रतिनिधी**

बहुचर्चित व सातत्याने तक्रारी होत असलेल्या रोहा वराठीमार्गे तांबडी रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. प्राथमिक स्वरूपात खड्डे भरण्यात येत असून साईट पट्टीचे काम सुरू झाले आहे. हा रस्ता होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे. त्यामुळे मुरुडकडे जाणाऱ्या पर्यटकांचा प्रवास सुखकर होणार आहे. या चालू केलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन केली. नागरिकांचा प्रश्न सुटल्याने यावेळी त्यांनी समाधान व्यक्त केले.



या वेळी सरपंच दत्तात्रय काळे, उपसरपंच रामदास दळवी, श्याम पाटील, उमेश सावंत, अशोक धवडेकर, आसद बोधले, अवधूत मातेरे, सचिन सावंत, चंद्रकांत सुतक, लक्समण सुतक व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. खासदार सुनील तटकरे यांनी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये नागरिकांनी या रस्त्यासंदर्भात तक्रारी केल्या होत्या. रस्त्यावर खड्डे व साईट पट्टी नसल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याच्याही तक्रारी करण्यात आल्या होत्या. खासदार सुनील तटकरे यांनी घेतलेल्या ज्येष्ठ नागरिक सभागृह येथील अधिकाऱ्यांच्या दोन बैठकांमध्ये या रस्त्याविषयी चर्चा करण्यात आली होती.

हा रस्ता दुरुस्त करावयासाठी खासदार सुनील तटकरे यांनी सज्जड दमही अधिकाऱ्यांना भरला होता. अखेर मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे भरण्यात येत आहेत. साईड पट्टीही भरण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. चांगल्या प्रकारे खड्डे भरावे ही नागरिकांची अपेक्षा आहे. थातूरमातूर खड्डे भरल्यास पावसाळ्यात वाहून जाण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे चांगले खड्डे भरावे, अशी मागणी होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग अंतर्गत येत असलेला हा रस्ता रोहा ते मुरुड जाण्यासाठी सगळ्यात जवळचा रस्ता म्हणून पाहिला जातो. यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीमध्ये तक्रारी मांडल्या होत्या. खासदार सुनील तटकरे यांनी वनखाते व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात शिष्टाई करून हा रस्ता लवकरात लवकर तयार करण्याचे सूचना दिल्या होत्या. यासाठी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनीही सातत्याने खासदार सुनील तटकरे यांना सांगितले होते.

रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागल्याने रोहा ते तांबडीदरम्यानच्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

# नेरळची पैवाडी झाली ओसाड; जुन्या झाडांची कत्तल

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील स्वातंत्र्यसैनिक डॉ. पै यांची नेरळ विद्यामंदिर शाळेच्या बाजूला असलेली पैवाडी आता ओसाड दिसू लागली आहे. त्या ठिकाणी असलेली सर्व जुनी झाडे जमीन मालकाने तोडून टाकली आहेत. ती झाडे परवानगी घेऊन तोडली असल्याचे वन खात्याचे म्हणणे आहे. पण हजारो पक्ष्यांचे रात्रीचा निवारा असलेली झाडे तोडल्याने मोठा अनर्थ घडला आहे. पर्यावरणप्रेमींनी त्या झाडांबद्दल दुःख व्यक्त केले असून त्या जमिनीवर नवीन झाडे लावली जाणार असल्याचे वन विभागाकडून आता सांगितले जात आहे.



दरम्यान, नेरळ येथील रेल्वेमार्गाला लागून असलेल्या स्वातंत्र्यसैनिक डॉ. पै यांच्या वाडीमध्ये संध्याकाळ झाली की वटवाघूळ हा पक्षी येथील झाडांवर निवास शोधत यायचे. रात्रीच्या वेळी काहीही दिसत नाही असे बोलले जात असलेल्या वटवाघूळ तेथील शेकडो झाडांवर हजारोंच्या संख्येने लटकलेले दिसत असायचे. अगदी सकाळ झाली की ती वटवाघूळ पुन्हा अन्न शोधण्यासाठी झाडांपासून बाजूला होत मुक्तपणे आपली सैर करायचे. त्यामुळे नेरळ विद्या मंदिर शाळेच्या बाजूला असलेली पैवाडी ही शेकडो वर्षे जुन्या झाडांची वाडी म्हणूनच नेहमी ओळखली जायची. मात्र मागील काही वर्षे नेरळ गावातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या पैवाडीची विक्री होणार असे बोलले जात होते. सव्वातीन एकराचा हा महत्त्वाचा जमिनीचा तुकडा आहे. तो मिळवण्यासाठी गुंतवणूकदार विशेष प्रयत्न करीत होते. शेवटी या भूखंडाचा विकास करण्यासाठी सर्वात महत्वाची अडचण ही येथील झाडे बनली होती. उंचच उंच असलेली ही जुनी झाडे ही जमिनीच्या विक्रीत अडथळा ठरत होती.

दरम्यान, मागील काही दिवसांमध्ये वन विभागाची परवानगी घेऊन पैवाडीमधील बहुसंख्य म्हणून शंभरहून अधिक झाडांची कत्तल करण्यात आली आहे. तेथे असलेली झाडांचे बुंधे दोन व्यक्तींच्या कवेत मावणार नाहीत असे मोठे आणि विशालकाय स्वरूपाचे होते. वटवाघूळ हा आताच्या परिस्थितीमध्ये काहीसा दुर्मीळ होत चाललेला जंगली पक्षी आहे. वन विभागाने खरेच ती जुनी झाडे तोडण्याची परवानगी दिली असली तरी तेथे आता संबंधित जमीन मालक नवीन झाडे लावणार असल्याचे तेथील वनपाल सांगत आहेत. तेथे नवीन झाडे लावल्यास हा परिसर पुन्हा पहिल्यासारखा बहरू शकतो.

## डॉ. महेश निमणेंना वास्तुरत्न भारत श्री पुरस्कार प्रदान

**खोपोली : प्रतिनिधी**

समाजकार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणाऱ्या 'महाराष्ट्र श्रम कामगार संघटना'आयोजित 'भारत श्री'कार्य गौरव सोहळ्यात डॉ. महेश निमणे यांना 'वास्तुरत्न भारत श्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


हा भव्य सोहळा नुकताच पुणे येथील पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ येथे पार पडला. 'कार्य सन्मान... राष्ट्राचा अभिमान' या ब्रीदवाक्याला अनुसरून अहोरात्र कष्ट करून समाजाच्या प्रगतीसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या मंचावरून गौरविण्यात आले.



## रेवदंड्यात श्री स्वामी याग, विष्णू याग संपन्न

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रचार–प्रसार अंतर्गत आयोजित ग्राम अभियान मांदियाळी सोहळ्याचे वर्ष २रे औचित्य साधून रेवदंडा येथे श्री स्वामी याग व श्री विष्णू याग सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.



ब्र.भू.प.पू. मोरेदादा तथा प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. २१) श्री साईबाबा मंदिर, कान्होजी आंग्रे नगर, रेवदंडा येथे हा भव्य धार्मिक सोहळा पार पडला. श्री स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पहाटे ५ वाजता मडळ पूजेने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर भूपाळी आरती, सामुदायिक याग, नैवेद्य आरती झाली व सकाळी ११ वाजता मुख्य श्री स्वामी याग व श्री विष्णू याग संपन्न झाला. या वेळी वेदमंत्रांच्या घोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

दरम्यान, दुपारी जोगवा, महाप्रसाद, हळदी–कुंकू कार्यक्रम संपन्न झाला. सायंकाळी अनुभव कथनात अनेक सेवेकऱ्यांनी स्वामी कृपेचे अनुभव सांगितले. औदुंबर प्रदक्षिणेनंतर सायंकाळी ६.३० वाजता नैवेद्य आरती आणि मंत्रपुष्पांजलीने सोहळ्याची सांगता झाली. हा धार्मिक सोहळा श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास आणि बाल संस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित), अष्टमी–रोहा यांच्या प्रमुख केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात आला. "संस्कार केले तर संस्कृती टिकेल, संस्कृती टिकेल तर धर्म टिकेल आणि धर्म टिकेल तर राष्ट्र टिकेल," हा संदेश या वेळी देण्यात आला. सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेवेचा लाभ घेतला. दिंडोरी प्रणित सेवा केंद्राच्या सेवेकऱ्यांनी संपूर्ण नियोजन उत्कृष्टपणे सांभाळले होते. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## दुचाकीस्वाराची जेसीबीला धडक; हेल्मेटमुळे वाचला जीव

**खोपोली : बातमीदार**

भरधाव दुचाकीस्वार रस्त्याच्या कडेला उभ्या जेसीबीवर जाऊन आदळून अपघाताची घटना बुधवारी (दि. २०) चौक–कर्जत मार्गावर वावर्ले गावाच्या हद्दीत घडली. सुदैवाने दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान केल्यामुळे दुचाकीस्वाराचा जीव वाचला आहे. चौक–कर्जत राज्यमार्गावर खालापूर हद्दीत सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास दुचाकीस्वार नियंत्रण सुटल्याने जेसीबीवर जाऊन आदळला. सुदैवाने हेल्मेटमुळे गंभीर दुखापत झाली नाही. हेल्मेटचा चक्काचूर झाला. किरकोळ जखमी दुचाकीस्वाराला वावर्ले प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



## पनवेल ते सुभेदारगंजदरम्यान तीन अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या हंगामातील प्रवाशांच्या मागणीला प्रतिसाद म्हणून, प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने पनवेल ते सुभेदारगंज दरम्यान तीन अतिरिक्त उन्हाळी विशेष रेल्वे सेवा चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे रायगडवासियांना त्याचा फायदा होणार आहे.

पनवेल ते सुभेदारगंज दरम्यान ३ अतिरिक्त सोडण्यात येणाऱ्या उन्हाळी विशेष गाड्यांमध्येपनवेल – सुभेदारगंज साप्ताहिक विशेष (०३ सेवा) गाडी क्रमांक ०४१०४ साप्ताहिक विशेष गाडी गुरुवारी दिनांक २१.०५.२०२६ आणि दिनांक २८.०५.२०२६ रोजी पनवेल येथून १५:२० वाजता सुटेल आणि सुभेदारगंज येथे दुसऱ्या दिवशी १८:०० वाजता पोहोचेल. (०२ सेवा) गाडी क्रमांक ०४१०३ साप्ताहिक विशेष गाडी बुधवार दिनांक २७.०५.२०२६ रोजी सुभेदारगंज येथून १४:४० वाजता सुटेल आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी १४:२० वाजता पोहोचेल. (०१ सेवा)यागाडीला कल्याण, नाशिक, भुसावळ, खंडवा, इटारसी, पिपरिया, जबलपूर, कटनी, सतना आणि माणिकपूर जंक्शन. हे थांबे देण्यात आले आहेत.



या गाडीची संरचना १ वातानुकूलित द्वितीय, ६ वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ५ सामान्य द्वितीय श्रेणी ज्यात १ सामानासह गार्ड्स ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅन समाविष्ट आहे.

विशेष गाडी क्रमांक ०४१०४ साठी विशेष शुल्कावर बुकिंग सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू आहे.प्रवासी तिकीट बुकिंगसाठी RailOne ॲप देखील डाउनलोड करू शकतात.या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा, असे आवाहन केले आहे.

# माथेरानचे स्वच्छतादूत राकेश कोकळे यांचा सत्कार

**माथेरान : बातमीदार**

माथेरानच्या मातीत जन्मलेले आणि माथेरानच्या निसर्गावर निस्सीम प्रेम असणारे भूमिपुत्र तथा माथेरानचे स्वच्छतादूत राकेश कोकळे यांनी मागील अनेक वर्षांपासून केलेल्या कार्याची दखल घेत गोवा येथील लायन्स इंटरनॅशनल यांच्या वतीने माथेरानचे स्वच्छतादूत तथा धनगर समाजाचे अध्यक्ष, अश्वचालक राकेश कोकळे यांचा मंगळवारी (दि.१९) गोवा राज्यात स्वच्छतेच्या कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.



माथेरानमधील प्लास्टिक कचरा गोळा करून तो नगरपालिका कर्मचारीवर्गाकडे गोळा करीत असतात. पर्यावरणप्रेमी अवलिया अशीच ओळख निर्माण करून आजपर्यंत गावातील बहुतेक ठिकाणी आपल्या मित्रपरिवार सोबत जाऊन वेळप्रसंगी कड्याकपारीत स्वतः उतरून प्लास्टिक बाटल्या, रपेर्स तसेच अन्य प्लास्टिकजन्य कचरा नियमितपणे गोण्यांमध्ये संकलन करून नगरपालिका सफाई कामगारांमार्फत योग्य स्थळी हलविण्यात येत आहे.

पद्मश्री पुरस्कार विजेते तसेच एक्स BARC शास्त्रज्ञ आणि पर्यावरणतज्ज्ञ डॉ. श्याम काळे तसेच लायन्स क्लबचे मुर्तुजा ताहेर माथेरानवाला यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. राकेश कोकळे ध्येयवेडा असून स्वच्छतेच्या बाबतीत खूपच कटाक्ष आहे. प्रत्येक पॉईंट्सवर जाऊन तेथील जंगल भागातील परिसराची पाहणी करून जेवढ्या प्रमाणात प्लास्टिकजन्य कचरा असेल तो गोळा करण्यासाठी आपल्या मित्रपरिवारासोबत नेहमीच तत्पर असतात. त्यांच्या या कृतीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



पेण : शहरातील गोविंद बागेचे डांबरीकरण तसेच रोजची पाहणी करण्यात आली. या वेळी नगराध्यक्ष प्रितम पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, नगरसेविका जास्मिन पाटील, पल्लवी पाटील, आफ्रिन आखवारे, नगरसेवक प्रवीण पाटील आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **आनंदप्रकाश रामलखन यादव व जयप्रकाश रामलखन यादव** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे – जुई (५५३३३० ),
ULPIN : 12630050808, ता. उरण जि. रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १०१ /५४ खाते क्रमांक ७९८ | २ | ०.१७.०० पो.ख ०.०२.०० | १.६९ |
| | | एकूण क्षेत्र ०.१९.०० | |

**आनंदप्रकाश रामलखन यादव व जयप्रकाश रामलखन यादव यांचे नावे असलेले एकूण क्षेत्र ०.१९.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२ मे २०२६

सही/–
**ॲड. निलेश झंजाड**

बी १०४ सफायर, सी. एच. एस. लि., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे – ता.पनवेल, जि. रायगड
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **आनंदप्रकाश रामलखन यादव व जयप्रकाश रामलखन यादव** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे – जुई (५५३३३० ),
ULPIN : 15632434656, ता. उरण जि. रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १०१ /२९ खाते क्रमांक ७९७ | १ | ०.३८.७० पो.ख ०.०४.८० | ३.७५ |
| | | एकूण क्षेत्र ०.४३.५० | |

**आनंदप्रकाश रामलखन यादव व जयप्रकाश रामलखन यादव यांचे नावे असलेले एकूण क्षेत्र ०.४३.५० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२ मे २०२६

सही/–
**ॲड. निलेश झंजाड**

बी १०४ सफायर, सी. एच. एस. लि., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे – ता.पनवेल, जि. रायगड
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

# दिल्ली-मुंबई महामार्ग पनवेलमधील आठ गावातून जाणार; तांत्रिक तपासणी सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या दिल्ली-मुंबई कॉरिडॉरचे काम पनवेल तालुक्यातील मोरबे गावापर्यंत पूर्ण झाले असून पुढील टप्प्यात हा महामार्ग थेट कळंबोली सर्कलगतच्या आसूडगावपर्यंत जोडण्याची प्रक्रियेने वेग घेतला आहे. पूर्वी हा महामार्ग विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेला जोडला जाणार होता, मात्र विरार अलिबाग मार्गिकेचे काम रखडल्याने या नव्या प्रस्तावित मार्गिकेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून चालू आर्थिक वर्षात ते पूर्ण करण्याचे नियोजन प्राधिकरणाने केले आहे.

जेएनपीए बंदरातून अवघ्या १२ तासांमध्ये दिल्लीपर्यंत सूसाट जाता यावे म्हणून दिल्ली मुंबई कॉरीडॉरचे मूळ नियोजन करण्यात आले होते. परंतू त्यानंतर राज्य



सरकारने विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचे नियोजन केल्यानंतर पनवेल तालुक्यातील मोरबे गावाजवळील सर्कल येथे जोडण्यात येणार होता. मोरबे गावाजवळून कोन गाव त्यानंतर करंजाडेवरून जेएनपीए महामार्गाला पुढील मार्ग जोडणी होणार होती. मात्र, राज्य सरकारसमोर काही तांत्रिक व आर्थिक अडचणीमुळे विरार-अलिबाग मार्गिकेसाठी आवश्यक जमीन संपादन प्रक्रिया रखडली. त्यामुळे प्रकल्प पुढे सरकू शकलेला नाही. त्यामुळे दिल्ली मुंबई महामार्गाचे बांधकाम अंतिम टप्यात आल्यावर बांधलेल्या मार्गिकेला कळंबोली सर्कलला जोडण्याच्या पर्यायी मार्गाचा विचार करत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोरबे जंक्शन येथून थेट कळंबोली सर्कलजवळील आसूडगावपर्यंत रेल्वे रूळाशेजारील काँक्रीट मार्गिकेला हा महामार्ग जोडण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम हाती घेतले.

या प्रस्तावित मार्गिकेमुळे मोरबे, आदई, हरिग्राम, केवाळे, खानाव, नेवाळी, पनवेल आणि आसूडगाव परिसरातील जमिनींचा काही भाग प्रकल्पासाठी लागणार आहे. या आठ गावांमधील किती जमीन आणि कोणत्या सर्व्हे क्रमांकांच्या जमीनी यामधील प्रभावीत होतील हे अद्याप ठरले नसले तरी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नियोजन विभाग यामध्ये जोरदार काम करत असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगीतले. या भागातील भूभागाचा प्राथमिक अभ्यास सुरू असून तांत्रिक बाबींची तपासणी करण्यात येत आहे. सध्या डीपीआर तयार करण्याचे काम अंतिम टप्प्याकडे जात असल्याची माहिती प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी दिली.

दिल्ली-मुंबई कॉरिडॉर हा देशातील महत्त्वाचा द्रुतगती संपर्क प्रकल्प मानला जात असून या मार्गिकेमुळे पनवेल परिसरातील मुंब्रा पनवेल, कल्याण तळोजा या महामार्गांवरील वाहतूक कोंडीला पर्यायी मार्ग उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. डीपीआर पूर्ण झाल्यानंतर जमीन संपादन, पर्यावरणीय परवानग्या आणि प्रत्यक्ष कामाच्या प्रक्रियेला गती मिळणार असल्याचेही अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

मोरबे ते कळंबोली सर्कल या मार्गिकेसाठी डीपीआर बनविण्याचे काम सुरू आहे. ज्यावेळेस संबंधित मार्गिकेसाठी लागणा-या जमीनीचे भूसंपादन किमान ९० टक्के पुर्ण होईल त्याचवेळी कामाला सुरूवात करू शकतो.

# एपीएमसी बाजारात दुर्घटनेची भीती

## भाजीपाला आणि फळ बाजारातील गाळ्यांची अवस्था बिकट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई कामगारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.महानगरपालिकेने २०२६-२७ या वर्षासाठी जाहीर केलेल्या धोकादायक इमारतींच्या यादीत एपीएमसी परिसरातील अनेक महत्त्वाच्या इमारतींचा समावेश करण्यात आल्यामुळे येथे दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एपीएमसी बाजरातील इमारती धोकादायक ठरणे ही बाब नवीन राहिलेली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून एपीएमसीतील विविध बाजार विभागांतील इमारती धोकादायक घोषित केल्या जात आहेत. दरवर्षी यादीत नावे येतात, नोटिसा दिल्या जातात, काही ठिकाणी दुरुस्तीचे आदेश होतात, पण एकूण परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही.संपूर्ण बाजाराचा विचार केला तर प्रशासकीय कार्यालयापासून ते मोठ्या गाळ्यांपर्यंत अनेक इमारती धोकादायक यादीत येणे ही गंभीर बाब मानली जात आहे. रोजची मोठी गर्दी, मालवाहतूक आणि जुन्या बांधकामांची अवस्था यामुळे



सुरक्षिततेचा प्रश्न अधिकच पुढे येत आहे.

महानगरपालिकेने स्पष्ट सूचना दिल्या आहेत की अतिधोकादायक इमारतींचा वापर तात्काळ थांबवावा आणि दुरुस्ती आवश्यक असलेल्या इमारती वेळेत सुरक्षित कराव्यात. नियमांचे पालन न झाल्यास दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित मालक आणि व्यवस्थापनावर राहील, असेही बजावण्यात आले आहे.

दरवर्षी धोक्याच्या यादीत नाव येऊनही कायमस्वरूपी उपाय दिसत नसल्याने यंदा तरी या बाजाराच्या पुनर्रचनेबाबत ठोस निर्णय घेतला जातो का, याकडे व्यापारी आणि बाजार घटकांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, एपीएमसी प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ न शकल्याने प्रशासनाची अधिकृत भूमिका कळू शकलेली नाही.

या वर्षीच्या यादीत सर्वात गंभीर बाब म्हणजे मसाला बाजारातील मध्यवर्ती इमारत. 'शिकागो प्रकार-२, बाजार-२' म्हणून ओळखली जाणारी ही इमारत अतिधोकादायक म्हणजेच 'सी-१' श्रेणीत ठेवण्यात आली आहे. ही इमारत पूर्णपणे जर्जर अवस्थेत असून ती तात्काळ रिकामी करून पाडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.त्याशिवाय 'सी-२ अ' श्रेणीत काही महत्त्वाच्या इमारतींचा समावेश आहे. यामध्ये एपीएमसीचे प्रशासकीय सचिव कार्यालय, भाजीपाला बाजारातील इमारत आणि फळ बाजारातील जी-३११ व जी-३१२ हे गाळे यांचा समावेश आहे.. या इमारती तात्काळ रिकाम्या करण्याची गरज नसली तरी मोठ्या प्रमाणावर संरचनात्मक दुरुस्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# उरणमध्ये औषध विक्रेत्यांचा बंद

**उरण : बातमीदार**

ऑनलाइन विक्री होत असलेल्या शेड्युल औषधांविरुद्ध तसेच तरुण पिढीला सहज डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय उपलब्ध होत असलेल्या नशा येणाऱ्या औषधांच्या, ऑनलाइन सहज उपलब्ध होणाऱ्या अँटिबायोटिक्स औषधांचा अनियमित वापर आणि त्यामुळे होणारे रेजिस्टन्सबाबत जनहितार्थ २० मे रोजी औषध विक्रेत्यांनी बंद पुकारला गेला होता.

यास सहयोग म्हणून केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन रायगड डिस्ट्रिक्टचे अध्यक्ष लीलाधर पाटील आणि जिल्हा सचिव प्रवीण नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याकडून आलेल्या सूचनानुसार उरण तालुकाने औषध विक्री बंद पुकारला होता. ऑनलाइन डुप्लिकेट औषध विक्रीच्या संकटासमोर आपला व्यवसाय अबाधित राखण्यासाठी तसेच सर्व जनतेचा स्वास्थासाठी सभासदांनी एकजुटीने उभे राहिले.

उरणमधील सर्व १२० मेडिकल बंदमध्ये सामील झाली होती. याचा काही अंशी नियमिय औषधे हवी असणाऱ्या रुग्णांना फटका बसला, परंतु ज्या रुग्णांना अत्यावश्यक औषध हवी होती त्यांना औषधे पुरवण्याची व्यवस्था संघटनेचे पदाधिकारी यांनी केली होती त्यामुळे कुठेही बंद मुळे अत्यावश्यक औषधे हवी असलेल्या रुग्णांस त्रास जाणवला नाही. उरण तालुका अध्यक्ष उमाकांत पानसरे सचिव राजेश्वर गावंड यांनी या संदर्भात माहिती दिली.

या बंदमुळे काही अंशी रुग्णांची गैरसोय झाली, परंतु पुढच्या पिढीच्या भल्यासाठीही नशेची औषध आणि अँटिबायोटिक्स तसेच विशिष्ट प्रवर्गातील औषधे जे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय देऊ शकत नाही तीऔषधे विक्री ऑनलाइन बंद होणे आवश्यक आहे, त्यासाठी हा एकदिवसीय लाक्षणिक बंद पुकारला गेला होता.

# जुईनगर-सानपाडा उड्डाणपुलासाठी महापौर सकारात्मक

**नवी मुंबई : बातमीदार**

जुईनगर-सानपाडा रेल्वे ट्रॅकवरील धोकादायक रेल्वे क्रॉसिंगमुळे वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जुईनगर सानपाडा रेल्वे क्रॉसिंगवर लवकरच उड्डाणपूल उभारण्यात येईल त्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत, अशी माहिती नवी मुंबईच्या महापौ सुरज सुजाता पाटील यांनी दिली. सुजाता पाटील यांनी जुईनगर येथील रेल्वे क्रॉसिंग व त्यालगत असलेल्या नालेसफाईची पाहणी केली त्यावेळी त्या बोलत होत्या.

जुईनगर-सानपाडा रेल्वे क्रॉसिंगवर तातडीने उड्डाणपूल उभारण्याची मागणी नवी मुंबई जिल्हा भाजपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी महापौर सुजाता



पाटील यांच्याकडे निवेदन देऊन केली होती. या निवेदनाची दखल घेत महापौर सुजाता पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत जुईनगर-सानपाडा रेल्वे ट्रॅक तसेच परिसरातील नालेसफाई कामांची नुकतीच प्रत्यक्ष पाहणी केली. याप्रसंगी डॉ. राजेश पाटील, स्थानिक नगरसेविका डॉ. प्रणाली पाटील तसेच माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, माजी प्रभाग समिती सदस्य विजय साळे आणि जुईनगर प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुईनगर-सानपाडा रेल्वे क्रॉसिंगवर दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. मात्र, रेल्वे क्रॉसिंगवर सुरक्षिततेची योग्य उपाययोजना नसल्याने या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे जुईनगर-सानपाडा रेल्वे ठिकाणी लवकरात लवकर

> *जुईनगरमध्ये लोकवस्ती वाढत आहे. आगामी काळात पुनर्विकास होण्याची शक्यता लक्षात घेता, त्यातून वाहनांची संख्या वाढणार आहे. अशा वेळी या अरुंद रस्त्यांवर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. आम्ही शहरासाठी सिटी मोबालीटी प्लान अंतर्गत लहान उड्डाणपूल, भुयारी मार्गांची संकल्पना आखलेली आहे. त्या अंतर्गत हा उड्डाणपूल करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.*
>
> **- सुजाता पाटील,** महापौर, नवी मुंबई महापालिका

उड्डाणपूल उभारुन नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी मागणी डॉ. राजेश पाटील, यांनी केली होती. पाहणी दौऱ्यात महापौ सुजाता पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जुईनगर-सानपाडा रेल्वे क्रॉसिंग समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या असून, आवश्यक त्या कामांचा प्रस्ताव लवकर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. रेल्वे क्रॉसिंगवरील पुलासाठी लागणारी रेल्वे प्रशासनाची परवानगी महापालिका प्रशासनाकडे आहे. जुईनगर-सानपाडा रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल उभारण्याचा मुद्दा महासभेत आणून लवकरात लवकर जुईनगर-सानपाडा रेल्वे क्रॉसिंगवर पूल उभारण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन महापौर सुजाता पाटील यांनी यावेळी उपस्थितांना दिले.

# अधिकाऱ्यांच्या असहकार्यावर नवी मुंबई महापौरांचे प्रश्नचिन्ह



**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील अनेक कामाच्या फाईल्स कोळंबल्या आहेत. अधिकाऱ्यांना बोलावल्यावर येत नाहीत. सातत्याने त्यांना निरोप पाठवले जातात. सर्व नगरसेवकांच्या या तक्रारी आहेत. अद्याप अधिकारी प्रशासकीय राजवटीतून बाहेर पडलेले नाहीत. या शहरातही, शहरातील समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे केलेल्या कामांची चौकशी करण्यासाठी, सध्या होत असलेल्या कामांवर अंकुश ठेवण्यासाठी समित्या नेमण्याची गरज आम्हाला भासली आहे. आमचा निर्णय योग्य असल्याचे दिसून येत असल्याचे मत महापौर सुजाता पाटील यांनी व्यक्त केले.

त्या नवी मुंबई पालिकेतील भाजपकडून १०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल वाशी येथे पत्रकार परिषद घेतली त्यावेळी, महापौर सुजाता पाटील यांनी गेल्या १०० दिवसांतील सेवाकार्याचा सविस्तर लेखाजोखा पत्रकार परिषदेतून जनतेसमोर सादर केला. यावेळी उपमहापौर दशरथ भगत, सभागृह नेते सागर नाईक, माजी महापौर जे डी सुतार, भाजपाचे नगरसेवक रामचंद्र घरत, सूरज पाटील, आरोग्य समितीचे सभापती डॉ. जयाजी नाथ, शुभांगी पाटील उपस्थित होते.

यावेळी सुजाता पाटील यांनी माहिती देताना सांगितले की, १०० दिवसांच्या कालावधीत अर्थसंकल्प २०२६-२०२७ मध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टीत कोणतीही करवाढ न करता, पाणीपट्टी शुल्कावर ९०% सवलत देण्याचा जनहिताचा निर्णय घेण्यात आला. गावठाण व एलआयजी क्षेत्रातील बांधकामांवरील शास्ती केवळ ५% पर्यंत मर्यादित करून तिप्पट कर पूर्णपणे रद्द करण्यात आला. महिला महापौरांच्या नेतृत्वात परिवहन सेवेत पहिल्यांदाच 'महिला बसचालक' भरती करून महिला सक्षमीकरणाचे ठोस पाऊल टाकण्यात आले.

# सानपाड्यात विराट हिंदू संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

हिंदू धर्माची गौरवशाली परंपरा जपण्यासाठी, समाजात ऐक्य-जागरुकता, संघटन निर्माण करण्यासाठी सानपाडा येथे सकल हिंदू समाजाकडून आयोजित करण्यास आलेल्या विराट हिंदू संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सानपाडा सेक्टर ७, ८ मधील गणेश मंदीर वस्ती, सानपाडा, संत गाडगेबाबा खेळाचे मैदान येथे या विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माथाडी नेते पांडुरंग आमले यांनी भूषविले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सायंकाळी ६ ते ६.४५ या वेळेत वातावरण निर्मिती व जनजागरणासाठी प्रेरणादायी हिंदुत्व गीत / देशभक्ती गीत, उपस्थित बांधवांचे स्वागत, राष्ट्रपुरुष वेशभूषा स्पर्धा, लहान मुलांकडून घोषवाक्ये / जयघोष आदी कार्यक्रम घेण्यात आले. सायंकाळी ६:४५ ते ७ या १५ मिनिटांच्या कालावधीत भारतमातेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.



सायंकाळी ७ ते ७.३० या वेळेत पंचपरिवर्तन या विषयावर विवेकानंद केंद्र नवी मुंबईच्या संयोजिका डॉ. सौ. वंदना महाजनी यांचे व्याख्यान झाले. सायंकाळी ७.३० ते ८ या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज- अफजलखान वध पोवाडा सादर करण्यात आला. सायंकाळी ८ ते ८.२० या २० मिनिटाच्या कालावधीत सानपाडा महासंघाचे अजय पवार यांनी स्थानिक विषय व समस्यांची मांडणी केली.

सायंकाळी ८.२० ते ८.५० या ३० मिनिटाच्या कालावधीत बजरंग दलाचे नवी मुंबई जिल्हा संयोजक शंकर सकपाळ यांनी हिंदू समाज जागरण व संघटन काळाची गरज या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. सायंकाळी ८.५० ते ९ या १० मिनिटाच्या कालावधीत हिंदुत्व रक्षण प्रतिज्ञा व मंत्र, हिंदुत्व निरंतर स्मरण, आचरण व रक्षण घेण्यात आले.

या कार्यक्रमास माथाडी नेते, माजी आमदार व मराठा महासंघाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील व सानपाडा नोडमधील नगरसेवक, माजी नगरसेवक, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व स्थानिक रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अखेरीस पांडुरंग आमले यांनी उपस्थितांचे आभार मानले, त्यानंतर सर्वांनी वंदे मातरमच्या घोषणा देत कार्यक्रमाची सांगता केली.

# वाशी सेक्टर ३०मधील भूखंडाची उपमहापौरांकडून पाहणी



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर ३० येथील कृष्णा रिजेन्सी इमारतीजवळील रिकामा भुखंड आहे. या भूखंडावर झाडे झुडपे वाढली असून, डेब्रिज टाकण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात अस्वच्छ पसरली आहे. याविषयी परिवहन समिती सदस्य राजेश राय यांनी याविषयी आवाज उठवला. हा भुखंड स्वच्छ करून नागरी सुविधांसाठी वापरावा अशी मागणी राय यांनी उपमहापौर दशरथ भगत यांच्याकडे पत्रवदारे केली होती. त्याला अनुसरून उपमहापौर दशरथ भगत यांनी या भूखंडाची पाहणी केली.

भूखंडाची स्वच्छता करून त्याचे खेळाचे मैदान म्हणून विकास करण्याबाबत परिवहन समिती सदस्य राजेश राय यांनी उपमहापौर दशरथ भगत यांच्याकडे निवेदन दिले होते. या निवेदनाच्या अनुषंगाने काल वाशी येथे उपमहापौर दशरथ भगत यांनी सदर ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. व राजेश राय यांनी निवेदनातून केलेल्या मागणीनुसार सदर भूखंडावर असलेला कचरा, डेब्रिज आणि इतर काही घाण आहे ती लगेच साफ करण्यात येईल. असे आश्वासन दिले. तसेच मुलांना खेळण्यासाठी मैदान करण्यात यावे राजेश राय यांनी केलेल्या या मागणी वर विचार करू, असेही उपमहापौर दशरथ भगत यांनी सांगितले. याप्रसंगी राजेश राय यांच्या समवेत स्वर्ण भारत टीव्ही चे अध्यक्ष अश्विन राय तसेच सोसायटीतील नागरिक उपस्थित होते.



**नवी मुंबई : एनआरआय येथील तलावात फ्लेमिंगोंचे आगमन झाल्याने जणू काही गुलाबी चादर पांघरल्याचा भास होतो.**

# व्यसनमुक्ती जनजागृती आणि दहशतवादविरोधी दिनानिमित्त उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभाग व त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने नेरूळ येथील नवी मुंबई आरटीओ कार्यालयातील लर्निंग लायसन्स विभागामध्ये दहशतवाद विरोधी दिन तसेच व्यसनमुक्ती जनजागृती अभियान गुरुवारी उत्साहात संपन्न करण्यात आले.



यावेळी शिकाऊ विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, वाहतूक नियम पालन, व्यसनमुक्त जीवन आदींचे महत्त्व तसेच देशविघातक प्रवृत्तींपासून दूर राहण्याचा संदेश प्रमुख मार्गदर्दिमार्गदर्शक दिलीप आमले यांनी देत विद्यार्थ्यांशी विशेष संवाद साधला .व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम त्यांनी सांगितले .व्यसनमुक्त जीवन ही काळाची गरज आहे असे सांगत युवकांनी स्वतःसह समाजालाही व्यसनमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अजित शिर्के यांनी दिला.

सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सर्वश्री अजित शिर्के,रचना गावित, प्राची देवरे यांनी वाहन शिकाऊ विद्यार्थ्यांकडून दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा घेत समाजात शांतता, एकता आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचा संदेश दिला . यावेळी उपप्रादेशिक कर्मचारी तसेच शिकाऊ विद्यार्थी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात २८ हजार नागरिकांनी केली स्वगणना

## ग्रामीण भागात अत्यल्प प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल जनगणना मोहिमेत रायगड जिल्ह्यात मोबाइल ॲप आणि ऑनलाइन प्रणालीद्वारे २८ हजार ६२६ नागरिकांची स्वगणना केली. जिल्ह्यात एकाही गावाने १०० टक्के स्वगणना पूर्ण केली नाही. स्वगणनेला अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे प्रगणकांचे काम मात्र वाढणार आहे.

देशभरात जनगणना प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि अचूक करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने प्रथमच डिजिटल स्वगणना उपक्रम राबवला. नागरिकांनी पोर्टलच्या माध्यामातून घर नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कुटुंब प्रमुखाला मोबाइल क्रमांकाचा वापर करून




स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. रायगड जिल्ह्यातील ३२ हजार ४७० कुटुंबांनी डिजिटल स्वगणना करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यापैकी २८ हजार ६२६ जणांचे प्रयत्न पूर्ण यशस्वी झाले. जवळपास ३ हजार ८४४ कुटुंबांची नोंदणी अपूर्ण राहिली. जिल्ह्यातील अलिबाग, पनवेल, उरण यांसारख्या शहरी भागांमध्ये काही प्रमाणात प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागात सहभाग अत्यल्प होता.

कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी एका गावाने स्वगणना प्रक्रिया १०० टक्के पूर्ण केल्याची नोंद झाली आहे, मात्र रायगड जिल्ह्यात एकाही गावाने १०० टक्के स्वगणना पूर्ण केली नाही. स्वगणना हा केवळ पहिला टप्पा असून पुढील टप्प्यात अधिकृत गणनाकर्मी घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत. त्यामुळे ज्या नागरिकांनी ऑनलाइन नोंदणी केलेली नाही, त्यांची माहिती नियमित जनगणना प्रक्रियेत समाविष्ट होणार आहे. डिजिटल भारत संकल्पनेशी निगडित या मोहिमेच्या पहिल्याच टप्प्यात अल्प प्रतिसाद मिळाल्याने प्रगणकांचे काम मात्र वाढणार आहे.

# राज्यातील गोजातीय प्रजनन अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करा

## ■ पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांचे निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाने "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३" लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खासगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला दिले आहेत.

राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम



रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्र), भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

कलम ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर रु. ५०,००० पर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्राविना गोजातीय प्रजनन क्रिया करणे, अथवा प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोठवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर रु. १,००,००० पर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची/दिशाभूल करणारी जाहिरात किंवा प्रसिद्धी केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर सहा महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा रु. २,००,००० पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.



# 'गेल इंडिया'ला धरणातील गाळ काढण्यासाठी निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

उमटे धरणातील ४५ वर्षांपासून साचलेला गाळ काढण्यासाठी सामाजिक बांधिलकी निधीतून मदत उपलब्ध करून देण्याबाबत उमटे धरण संघर्ष ग्रुपचे ॲड. राकेश पाटील यांनी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य अनंत गोंधळी यांच्या समवेत उसर येथील गेल इंडिया लि. कंपनीचे संचालक अनुप गुप्ता यांना निवेदन दिले आहे.

सदरच्या निवेदनात नमूद केले आहे की, अलिबाग तालुक्यातील रामराज परिसरातील उमटे धरणाची निर्मिती १९७८ मध्ये करण्यात आली. धरणाची उंची ५६.४० मीटर, तर साठवण क्षमता ८७ दशलक्ष घनफूट आहे. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत उमटे धरणाच्या देखभाल-दुरुस्तीचे काम केले जाते. या धरणातील गाळ गेली ४५ वर्षांपासून काढलेला नाही. यामुळे ८७ दशलक्ष घनफूट असलेली धरणाची साठवण क्षमता आता ३० दशलक्ष घनफुटावर आली आहे. त्यामुळे तालुक्यातील ४७ गावे व डोंगराळ भागात राहणाऱ्या ३३ आदिवासी वाड्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

अलिबागमधील सुडकोली, रामराज, बोरघर चिंचोटी, बेलोशी, रेवदंडा, चौल वरंडे, नागाव, आक्षी या ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना उमटे धरणातून पाणीपुरवठा होतो. धरणातील गाळाच्या प्रश्नांवर उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड संघटना १० वर्षांपासून शासन स्तरावर आवाज उठवत आहे. धरणामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे त्याची जलसाठा क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.




# रेवदंड्यातील नूतन मच्छी मार्केटचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंड्यातील नूतन मच्छी मार्केटचा शानदार शुभारंभ बुधवारी (दि. २०) सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या शुभारंभ कार्यक्रमाचे नियोजन रेवदंडा ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले होते.

या वेळी चौल गण जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ, रेवदंडा गट पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी तसेच रेवदंडा ग्रा. पं. सरपंच प्रफुल्ल मोरे, ग्रा. पं. सदस्य राजन वाडकर या प्रमुख मान्यवरांसह ग्रा.पं.सदस्य खलिल तांडेल, सुराराम माळी, कोळी समाज नेते ज्ञानेश्वर टिवळेकर, ताराचंद कोंडे, गोरखनाथ नवरीकर, शिवसेना शिंदे गट युवासेना सदस्य हर्षल घरत, रेवदंडा शिवसेना शहरप्रमुख योगेश पिटनाईक, नवनीत मेस्त्री, गजानन झेडेकर, किशोर मानकर, संतोष कोंडे, सामाजिक कार्यकर्ते राजू चुनेकर, रेवदंडा महिला शहर अध्यक्ष शलाका राऊत, थेरोंडा कोळी समाज कमिटी सदस्य तसेच मोठ्या संख्येने रेवदंडा-थेरोंडा ग्रामस्थांची उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व फीत कापून नूतन मच्छी मार्केटचा शुभारंभ करण्यात आला. हे नूतन मच्छी मार्केट आमदार महेंद्र दळवी यांच्या निधीतून थेरोंडा-रेवदंडा ग्रामस्थांच्या मागणीने बांधण्यात आले आहे. रेवदंडा को.ए.सो. हायस्कूलमार्गे समुद्रकिनारी जात असलेल्या रस्ताच्या कडेला नूतन मच्छी मार्केट बांधण्यात आले आहे.

# इयत्ता दहावी, बारावीतील गुणवंतांचा श्रीवर्धनमध्ये सत्कार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मार्च २०२६मध्ये पार पडलेल्या इयत्ता १० वी आणि १२वीच्या बोर्ड परीक्षेत श्रीवर्धन तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतून प्रथम क्रमांक पटकावून आपल्या यशाचा झेंडा फडकवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सार्वजनिक वाचनालय, श्रीवर्धन संस्थेच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. बुधवारी (दि. २०) वाचनालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना अवघी श्रीवर्धननगरी भारावून गेली होती.

या दिमाखदार सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महर्षी कर्वे मॉडेल स्कूलचे प्राचार्य दत्तात्रय राणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे होते. तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कष्टाने आणि जिद्दीने अव्वल स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मिहीर देशमुख (गोखले स्कूल, श्रीवर्धन), सौम्या सावंत (स्टार अ‍ॅकॅडमी हायस्कूल), निष्ठा चौलकर (वि. गो. लिमये विद्यामंदिर, दिवेआगर), संस्कृती कोलथरकर (हरिहरेश्वर माध्यमिक विद्यालय), अरिशा चोगले (ए. आर. उंड्रे इंग्लिश स्कूल, रानवली) यांचा गुणवंतांमध्ये समावेश आहे.

या वेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य दत्तात्रय राणे म्हणाले की, आजचा सत्कार हा तुमच्या कष्टाचे फळ आहे, मात्र ही केवळ सुरुवात आहे. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी आणि ध्येयाने प्रेरित होऊन वाटचाल करावी. वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत वाचनालय संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभी राहील, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाचनालयाचे उपाध्यक्ष विनय वैद्य यांनी केले. या वेळी वाचनालयाचे कार्यवाह गणेश सावंत, सदस्य डॉ. राजेश तोडकर यांसह तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने पालकवर्ग, वाचनालयाचे सभासद आणि वाचक उपस्थित होते. आपल्या मुलांचा सन्मान होताना पाहून अनेक पालकांनी या वेळी समाधान व्यक्त केले.



# वाघरे शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर यश संपादन करता येते याचे उत्तम उदाहरण देत वाघरे येथील इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वैदेही रुपाली दीपक तेटगुरे, प्रिन्स प्रिया




प्रकाश कांबळे, रिया समिता सचिन वनरसे यांचा समावेश असून त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळविले आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच शाळा व्यवस्थापनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत. शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा मोरे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करताना सांगितले की, विद्यार्थ्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते.

भविष्यातदेखील ही मुले शैक्षणिक क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी करतील असा विश्वास आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, प्रशासकीय मंडळ, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद तसेच पालकांनी अभिनंदन करीत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या नावाला नवी उंची मिळाली असून संपूर्ण परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# 'एएके इंडिया'कडून मोफत नेत्र तपासणी



**चौक** : ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव यांनी आपल्या परिसरातील डोळ्यांच्या रुग्णांसाठी मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिर आयोजित केले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार यांनी एएके इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने तुपगाव येथील संत गोरोबाकाका मंदिरात मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिर आयोजित केले होते. या शिबिराचा लाभ परिसरातील डोळ्यांच्या रुग्णांनी मोठ्या प्रमाणात घेतला. यावेळी डोळे तपासणी झाल्यावर ज्यांना चष्म्याची गरज होती त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. नेत्रसेवा हीच ईश्वरसेवा, हे ब्रीद वाक्य घेऊन एएके इंडिया प्रायव्हेट लि. ही सेवाभावी संस्था काम करीत आहे. डोळे तपासणी व चष्मे वाटप करून गरजूंना नवीन दृष्टी दिली. समाजहितासाठी राबवलेला हा उपक्रम खरोखरच प्रेरणादायी आहे, असे ज्यांनी लाभ घेतला त्यांनी सांगितले. या वेळी तुपगाव येथील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



**अलिबाग : येथील नगर परिषदेतर्फे उभारण्यात आलेले स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल गुरुवारी (दि.२१) गणेश पूजन करून नागरिकांसाठी खुले करण्यात आले. आमदार महेंद्र दळवी, नगराध्यक्ष अक्षया नाईक, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, रघुजी आंग्रे, उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा परिषद सदस्य आदिती दळवी, ॲड. प्रवीण ठाकूर तसेच नगरसेवक या वेळी उपस्थित होते. या क्रीडा संकुलामध्ये जलतरण तलाव, व्यायामशाळा, योगा हॉल, बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस, कॅरम या क्रीडा प्रकाराच्या सुविधा उपलब्ध आहेत.**

# केकेआरनेही मुंबईला हरवले

**कोलकाता : वृत्तसंस्था**



यंदाच्या हंगामात अतिशय खराब फॉर्मशी झुंजत असलेल्या हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सला कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धदेखील पराभवाचा सामना करावा लागला. पावसाने व्यत्यय आलेल्या या सामन्यात मुंबईला २० षटकांत आठ बाद १४७ अशा माफक धावसंख्येवर रोखल्यानंतर केकेआरने विजयाचे लक्ष्य १८.५ षटकांत चार गडी राखून सहजरीत्या पार केले.

विजयासाठी १४८ धावांचे आव्हान असताना केकेआरतर्फे मनीष पांडेने सर्वाधिक ४५, तर रोव्हमन पॉवेलने ४० धावांचे योगदान दिले. कर्णधार अजिंक्य रहाणेने २१ धावा जोडल्या. आघाडी फळीतील अन्य फलंदाज ठरावीक अंतराने बाद होत असले तरी माफक लक्ष्य असल्याने केकेआरने विजयाची संधी अजिबात दवडली नाही.

तत्पूर्वी अत्यंत महत्त्वाच्या लढतीत कोलकाता नाईट रायडर्सच्या गोलंदाजांनी ईडन गार्डन्सच्या संथ परिस्थितीचा अचूक फायदा उठवला. त्यांनी शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर मुंबई इंडियन्सला आठ बाद १४७ धावांवर रोखले. सामन्यापूर्वी खेळपट्टी बराच वेळ झाकून ठेवण्यात आली होती. या खेळपट्टीवर ढगाळ वातावरणात कोलकाताने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. कॅमेरून ग्रीन आणि डावखुरा वेगवान गोलंदाज सौरभ दुबे यांनी सुरुवातीला प्रत्येकी दोन बळी घेतले. ग्रीनने गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा दोन्ही आघाड्यांवर उत्कृष्ट कामगिरी बजावली. त्याने अवघ्या चार चेंडूंच्या अंतरात रायन रिकेल्टन आणि नमन धीर यांना बाद करून मुंबईला मोठे झटके दिले.

सामन्याच्या सुरुवातीलाच कोलकाताच्या गोलंदाजांनी मुंबईच्या फलंदाजीला खिंडार पाडले. कॅमेरून ग्रीनने तीन षटकांत २३ धावा देत दोन बळी घेतले, तर त्याला सौरभ दुबेने ३४ धावांत दोन बळी मिळवून मोलाची साथ दिली. या दुहेरी माऱ्यामुळे पहिल्या सहा षटकांच्या पॉवर प्लेमध्ये मुंबई इंडियन्सने अवघ्या ४१ धावांत आपले चार महत्त्वाचे फलंदाज गमावले होते.

### प्ले ऑफसाठी संधी

कोलकाता नाईट रायडर्सचा प्ले ऑफमध्ये जाण्याचा मार्ग अजूनही मोकळा आहे. मागील सातपैकी सहा सामने जिंकणारा केकेआरचा संघ १३ गुणांसह सहाव्या क्रमांकावर असून प्ले ऑफ गाठण्यासाठी त्यांना आपल्या शेवटच्या साखळी फेरीत दिल्ली कॅपिटल्सला नमवावे लागेल तसेच पंजाब व राजस्थान त्यांच्या शेवटच्या लढतीत पराभूत व्हावेत, अशी अपेक्षाही करावी लागेल.

## कॅरम स्पर्धेत समृद्धी घाडीगावकर, अझर सय्यद विजेते

**नवी मुंबई : बातमीदार**




ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनने ठाणे जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली १६ आणि १७ मे रोजी दोन दिवसीय ठाणे जिल्हा कॅरम मानांकन स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत महिला गटात डोंबिवलीच्या समृद्धी घाडीगावकर यांनी विजेतेपद पटकावले व ठाण्याच्या शिल्पा पळनीटकर यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर पुरुष गटात मुंब्रा येथील अझहर सय्यद यांनी विजेतेपद व कल्याण येथील संजय मांडे यांना उपविजेतेपद प्राप्त केले.

या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, ज्यामध्ये १८० खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये १६० पुरुष आणि २० महिलांचा समावेश होता. विशेष म्हणजे यात राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावरील अनेक खेळाडू होते. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या खेळाडूंनी आपले कौशल्य, अचूकता आणि खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केले.

विजेत्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव म्हणून त्यांना चषक, रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरण समारंभात एएसएचे मानद सचिव डॉ. हेमंत अनार्थे, व्यवस्थापन समिती सदस्य जगदीश नायक आणि अनंता कामत, क्रीडा समन्वयक राजीव साटम, सदस्य पट्टाबिरामन, प्रणय गिरकर यांच्यासह ठाणे जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव जितेंद्र दळवी, सहसचिव राजू सुस्विरकर उपस्थित होते. यावेळी कॅरम खेळातील योगदानाबद्दल ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे जितेंद्र दळवी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## तेजस्वी सिंग दहियाला मिळाली आयपीएल पदार्पणाची संधी

**कोलकाता : वृत्तसंस्था**



कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाकडून दिल्लीकर तेजस्वी सिंग दहिया याला मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात अचानक आयपीएल पदार्पणाची संधी मिळाली. मुंबई इंडियन्सच्या डावातील ११व्या षटकात युवा यष्टीरक्षक बॅटर अंगकृष रघुवंशी दुखापतग्रस्त झाला. त्याने मैदान सोडल्यावर बदली खेळाडूच्या रूपात तेजस्वी विकेटमागची जबाबदारी सांभाळण्यासाठी मैदानात उतरला.

तेजस्वी सिंग दहिया हा दिल्लीचा असून देशांतर्गत क्रिकेटमध्ये तो दिल्लीच्या संघाचे प्रतिनिधीत्व करतो. युवा विकेटकिपर आणि उजव्या हाताच्या बॅटरने दिल्ली प्रीमियर लीग २०२५च्या हंगामात २९ षटकार ठोकत आपल्या फलंदाजीतील धमक दाखवली होती. नितीश राणापाठोपाठ सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या स्थानावर होता.

तेजस्वी दहियाला २०२५च्या हंगामात अनसोल्डचा टॅग लागला, पण २०२६ची संघ बांधणी करताना कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने ३० लाख मूळ किंमत असलेल्या या युवा विकेटकिपर बॅटरसाठी तीन कोटी रुपये मोजले. यंदाच्या हंगामात त्याला संधी मिळणे मुश्किल होते, पण रघुवंशीच्या दुखापतीमुळे त्याचे नशीब पालटले. कन्कशनच्या रूपात त्याने आयपीएलमध्ये पदार्पण केले. मॅच फिनिश करून एक वेगळी छाप सोडण्याची संधी त्याच्याकडे होती, पण दोन चौकाराच्या मदतीने १२ चेंडूत ११ धावा करून तो बाद झाला.

कन्कशनच्या नियमानुसार रघुवंशीला किमान सात दिवस मैदानात उतरता येणार नाही. त्यामुळे साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात त्याला आणखी एक संधी मिळणार हे जवळपास निश्चित आहे.

## हार्दिक पांड्यावर बीसीसीआयची कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला मॅच फीच्या १० टक्के दंड आणि एक 'डेमेरिट पॉईंट' देण्यात आला आहे. कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध बुधवारी झालेल्या सामन्यादरम्यान आयपीएलच्या आचारसंहितेच्या लेव्हल १चे उल्लंघन केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली.

केकेआरच्या डावातील १०व्या षटकात ही घटना घडली. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या आपल्या रन-अपसाठी परत जात असताना त्याने रागाच्या भरात विकेटच्या बेल्स जोरात खाली पाडल्या होत्या. सामन्यादरम्यान क्रिकेटचे साहित्य किंवा कपडे, मैदानावरील साहित्य किंवा फिक्स्चर आणि फिटिंग्जचा गैरवापर करणे हा आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२चे उल्लंघन ठरते. या प्रकरणी हार्दिक दोषी आढळला. हार्दिक पांड्याला मॅच फीच्या १० टक्के दंड आणि एक 'डेमेरिट पॉईंट' देण्यात आला. दरम्यान, या सामन्यात कोलकाताने मुंबईवर चार गडी राखून विजय मिळवला आणि प्लेऑफच्या शर्यतीतील आपले आव्हान जिवंत ठेवले.

## अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघात गुजरात टायटन्सचे वर्चस्व

**मुंबई : प्रतिनिधी**



आयपीएल २०२६ स्पर्धेच्या थरारानंतर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात ६ जूनपासून एकमेव कसोटी आणि तीन सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या १५ सदस्यीय कसोटी संघात कर्णधार शुबमन गिलसह तब्बल सात खेळाडू गुजरात टायटन्स संघातील असून वनडे संघातही गुजरातच्या चार खेळाडूंना संधी मिळाली आहे.

आयपीएल २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. या स्पर्धेतील प्लेऑफमध्ये प्रवेश करणारे तीन संघ ठरले आहेत, तर एका स्थानासाठी तीन संघांमध्ये चुरशीची लढत सुरू आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना ३१ रोजी खेळवला जाणार आहे. ही मालिका झाल्यानंतर भारत आणि अफगाणिस्तान हे दोन्ही संघ वनडे आणि कसोटी मालिकेसाठी आमनेसामने येणार आहेत.

६ जूनपासून दोन्ही संघांमध्ये एकमेव कसोटी सामन्याचा थरार रंगणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघातील बहुतांश खेळाडू हे गुजरात टायटन्स संघातील आहेत.

अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या १५पैकी सात खेळाडू हे गुजरात टायटन्स संघाचे आहेत. गुजरात टायटन्सचा कर्णधार शुबमन गिल हा भारतीय कसोटी संघाचा कर्णधार आहे. यासह साई सुदर्शन, वॉशिंग्टन सुंदर, प्रसिध कृष्णा, मोहम्मद सिराज, मानव सुथार आणि गुरनुर ब्रार यांचा समावेश आहे.

यासह वनडे मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघातदेखील गुजरात टायटन्स संघाचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. या संघात गुजरातच्या चार खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. शुबमन गिल हा वनडे संघाचाही कर्णधार आहे. यासह प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर आणि गुरनुर ब्रार या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात कसोटी सामना ६ जूनपासून न्यू चंदिगडमध्ये खेळवला जाणार आहे, तर वनडे मालिकेतील सामने १४, १७ आणि २० जून रोजी खेळवले जातील.

## आर्सेनल फुटबॉल क्लबला प्रीमियर लीगचे जेतेपद

**लंडन : वृत्तसंस्था**




इंग्लंडमधील बलाढ्य आर्सेनल फुटबॉल क्लबची प्रीमियर लीग जेतेपदाची २२ वर्षांपासूनची प्रतीक्षा अखेर संपली. प्रीमियर लीगमध्ये झालेल्या सामन्यात विजय अनिवार्य असताना मँचेस्टर सिटीला बॉर्नमथविरुद्ध १-१ अशी बरोबरीच नोंदवता आली. त्यामुळे आर्सेनलचे २००३-०४ हंगामानंतरचे पहिले इंग्लिश प्रीमियर लीग जेतेपद निश्चित झाले.

माजी प्रशिक्षक आर्सन वेंगर यांच्या कार्यकाळाच्या अखेरीस आर्सेनलला निराशेचा सामना करावा लागला होता. त्यानंतर उनाइ एमरी यांनाही आर्सेनलला यश मिळवून देता आले नाही. आर्सेनलने २०१९मध्ये याआधी 'मॅनेजर' म्हणून काम करण्याचा अनुभव नसलेल्या मिकेल आर्टेटा यांच्याकडे संघाची जबाबदारी सोपवली. सुरुवातीला त्यांनाही संघर्ष करावा लागला. गेल्या तीन हंगामांत आर्सेनलला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले, मात्र यंदाच्या हंगामात अगदी सुरुवातीपासून गुणतालिकेत अग्रस्थान टिकवून ठेवत आर्सेनलने दोन दशकांनंतर प्रीमियर लीगचे जेतेपद मिळवले.

यंदाच्या हंगामातील आता एक सामना शिल्लक असताना आर्सेनलचे ८२ गुण झाले असून मँचेस्टर सिटीच्या खात्यावर ७८ गुण आहेत. त्यामुळे सिटीने अखेरचा सामना जिंकून तीन गुण मिळवले आणि आर्सेनलने आपला सामना गमावला, तरी सिटीचा संघ गुणतालिकेत आर्सेनलला गाठू शकणार नाही. मँचेस्टर सिटीने एप्रिलमध्ये झालेल्या सामन्यात आर्सेनलवर विजय मिळवत जेतेपदाच्या आशा पल्लवित केल्या होत्या.

यानंतर सिटीला कामगिरीत सातत्य राखता आले नाही. आर्सेनलने यानंतरचे चारही सामने जिंकले, तर सिटीला पाचपैकी दोन सामन्यांत बरोबरीवर समाधान मानावे लागले. त्यामुळेच सिटीचा संघ गुणतालिकेत आर्सेनलपेक्षा मागे पडला. आर्सेनलच्या जेतेपदात त्यांचा भक्कम बचाव निर्णायक ठरला.

### दमदार कामगिरीसह विक्रम

आर्सेनलने प्रीमियर लीगच्या या हंगामात ३७पैकी १९ सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांना एकही गोल करू दिला नाही. त्यांनी आठ सामने १-० अशा फरकाने जिंकले तसेच कॉर्नर किकच्या साहाय्याने आर्सेनलने १८ गोल नोंदवले. इंग्लिश प्रीमियर लीगमधील संघासाठी हा विक्रम ठरला. आर्सेनलने ३७ सामन्यांत २५ विजय नोंदवले, तर मँचेस्टर सिटीला २३ सामनेच जिंकता आले. हाच दोन संघांतील मुख्य फरक ठरला.

## भारतीय टी-२० संघाच्या कॅप्टन पदासाठी श्रेयस प्रबळ दावेदार -पॉंटिंग

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



सूर्यकुमार यादवनंतर भारताच्या ट्वेन्टी-२० संघाच्या कर्णधारपदासाठी श्रेयस अय्यर प्रबळ दावेदार असेल, असे मत पंजाब किंग्जचा मुख्य प्रशिक्षक रिकी पॉंटिंगने व्यक्त केले. सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली भारताने मार्च महिन्यात ट्वेन्टी-२० विश्वचषक उंचावला होता, मात्र गेल्या दीड वर्षात सूर्यकुमारने फलंदाजीत निराशाजनक कामगिरी केली आहे. त्यामुळे त्याचे राष्ट्रीय संघातील स्थान धोक्यात आले आहे.

'ट्वेन्टी-२० संघाचे नेतृत्व करण्यासाठी भारताकडे अनेक दावेदार आहेत, परंतु माझ्या मते श्रेयस अय्यर त्या दावेदारांमध्ये आघाडीवर आहे. यंदा आयपीएलच्या सुरुवातीपासूनच त्याने ट्वेन्टी-२० खेळाडू म्हणून स्वतःचा उच्च दर्जा सिद्ध केला. तो आता पूर्वीपेक्षा अधिक परिपक्व झाला आहे. सध्या त्याचा खेळ सर्वोच्च पातळीवर आहे,' असे पॉंटिंगने सांगितले.

श्रेयस सध्या भारताच्या ट्वेन्टी-२० संघाचा भाग नसला, तरीही क्रिकेटच्या लघुत्तम प्रारूपात त्याला कर्णधार बनविण्याबाबत चर्चा सुरू आहे. कर्णधार म्हणून श्रेयसने आयपीएलमध्ये छाप पाडली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली कोलकाता नाइट रायडर्स संघाने २०२४च्या स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. त्यानंतर २०२५मध्ये पंजाबचे नेतृत्व करताना श्रेयसने संघाला अंतिम फेरीत पोहचवले. यंदाच्या आयपीएल हंगामात पंजाबने सुरुवात दमदार केली होती.

'श्रेयसने प्रभावी कामगिरी केली आहे. आता तो कारकीर्दीच्या अशा टप्प्यावर आहे, जिथे त्याला नेतृत्व करण्याची संधी मिळाल्यास तो त्याचा पूर्ण फायदा घेईल. त्यामुळे भारतीय संघासाठी त्याचा निश्चितपणे विचार झाला पाहिजे,' असे पॉंटिंग म्हणाला.

## दीपक चहरने केली 'चिठ्ठी' सेलिब्रेशनची थट्टा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमधील सामन्यादरम्यान काही खेळाडू खास सेलिब्रेशनसह लक्षवेधून घेत असतात. यंदाच्या हंगामात चिठ्ठी सेलिब्रेशनचा एक नवा ट्रेंड पहायला मिळाला. अभिषेक शर्मा पासून ते आकाश सिंग आणि उर्विल पटेल यांनी खास कामगिरीनंतर खिशातून चिठ्ठी काढत आपला आनंद व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले. या सेलिब्रेशन ट्रेंडवर काही दिग्गजांनी नाराजी व्यक्त केली. आता दीपक चाहरने भर मैदानात चिठ्ठी सेलिब्रेशनची थट्टा केल्याचे पहायला मिळाले.

कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात पहिल्यांदा फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सच्या संघाने निर्धारित २० षटकात १४७ धावा करत कोलकाताच्या संघाला १४८ धावांचे टार्गेट दिले. या धावांचा पाठलाग करताना केकेआरची सुरुवात खराब झाली. दीपक चाहरने पहिल्या षटकात दोन चौकार मारणाऱ्या फिन ॲलन याचा बदला घेत त्याला बोल्ड करत तंबूचा रस्ता दाखवला. या विकेटनंतर खिशातून चिठ्ठी काढून ती दाखवण्याची हावभाव करत चाहरने मोकळ्या हाताने चिठ्ठी सेलिब्रेशनची थट्टा केल्याचे पहायला मिळाले. याची सोशल मीडियावर तुफान चर्चा रंगताना दिसत आहे.

## हॉकी प्रशिक्षक बलदेव सिंग यांना 'पद्मश्री'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रसिद्ध हॉकी प्रशिक्षक बलदेव सिंग यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. २५ मे रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात येईल.

शाहाबाद मार्कंडा या गावी प्रतिभावान हॉकीपटू घडविण्यासाठी प्रसिद्ध असलेले प्रशिक्षक बलदेव सिंग यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. ७५ वर्षीय बलदेव यांनी ८०हून अधिक आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आणि आठ भारतीय कर्णधारांना प्रशिक्षण दिले आहे. त्यांनी १९९३मध्ये कनिष्ठ पुरुष संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि निवडकर्ते म्हणून काम केले.

## आयपीएलमध्ये बिहारी खेळाडूंनी उमटवली छाप

**पाटणा : वृत्तसंस्था**



आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सुपरस्टार एकेकाळी मुंबई दिल्लीतच दिसायचे. आता बिहारच्या गावांतील युवा खेळाडू क्रिकेटचे मैदान गाजवत असल्याचे चित्र आहे.

बिहारमधील ताजपूरमधील १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी जगातील सर्वात मोठी लीग आयपीएलमध्ये अधिराज्य गाजवतोय. बड्या बड्या गोलंदाजांना त्याने आपल्या फटकेबाजीने शांत केले आहे. राजस्थान रॉयल्सकडून खेळणारा वैभव प्रत्येक सामन्यागणिक नव नवे विक्रम करीत आहे. 'छोट्या ताजपूरचा मोठा हीरो' असे त्याला म्हटले जाते.

ताजपूरपासून १८० किलोमीटरवर गोपाळगंज आहे. हे गाव आयपीएल स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या साकीब हुसेनचे. सनरायझर्स हैदराबादसाठी पदार्पण करणाऱ्या साकीबने आपल्या वेग आणि अचूकतेने सगळ्यांना प्रभावित केले आहे.

वैभवप्रमाणेच साकीबलाही टोपणनाव मिळाले आहे. गोपाळगंजचा रबाडा! दक्षिण आफ्रिकेचा प्रसिद्ध वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाप्रमाणे शैली असल्यामुळे साकीबला हे नाव मिळाले आहे.

या दोघांच्या बरोबरीने कोलकाता नाईट रायडर्सचा अनुकूल रॉय, दिल्ली कॅपिटल्सचा मुकेश कुमार आणि सनरायझर्स हैदराबादचा इशान किशन हेही आयपीएलमध्ये चमक दाखवत आहेत. या सगळ्यांना जोडणारा एक समान धागा आहे. तो म्हणजे बिहार. हे सगळे बिहारचे आहेत. आयपीएल बहरत असताना बिहार क्रिकेट संघटना अस्तित्वातच नव्हती. तरीही या राज्यातले पाच खेळाडू आयपीएल गाजवत आहेत.

१५ वर्षांसाठी म्हणजे २००३ ते २०१८ या कालावधीत बिहार क्रिकेट संघटनेवर गैरव्यवहार आणि अंतर्गत बंडाळ्या यामुळे बंदी घालण्यात आली होती. राज्य क्रिकेट संघटनाच रद्दबातल झाल्यामुळे त्यामुळे अनेक गुणी क्रिकेटपटू अन्य राज्यात गेले. काहींनी क्रिकेट खेळणेच सोडून दिले.

शतक उंबरठा ओलांडत असताना पाटण्यात लहानाचा मोठा झालेला इशान किशन झारखंडला गेला. पुढे जाऊन झारखंड संघाचा कर्णधार झाला. गोपाळगंजचाच मुकेश कुमार आणि डेहरी गावचा आकाश दीप बंगालला रवाना झाले. अनुकूलनेही झारखंडची वाट धरली. या सगळ्यांनी बिहारमधल्या युवा क्रिकेटपटूंसाठी एक पथदर्शक वाट तयार केली.

अगदी लहान असताना वैभव क्रिकेटच्या सरावासाठी समस्तीपूरमधल्या ताजपूरहून पाटण्याला जात असे. साकीबने गोलंदाजीला अगदी उशिरा सुरुवात केली. खूप सारे कष्ट केल्यानंतरच हे यश ही मंडळी अनुभवत आहेत.

### नव्या क्रिकेटपटूंना प्रेरणा

बिहार आणि झारखंड दोन्ही राज्यांसाठी खेळलेले आणि महेंद्रसिंह धोनीचे पहिले कर्णधार सुनील कुमीर सांगतात, धोनीने झारखंडसाठी काय केले ते आपल्या सगळ्यांसमोर आहे. झारखंड बिहारमधून वेगळे झाल्यानंतर धोनीच्या रूपात या राज्याला पोस्टरबॉय लाभला. झारखंड आताच्या घडीला देशातल्या अव्वल संघांपैकी एक आहे. इशान, वैभव, साकीब हे सगळे मूळचे बिहारचेच आहेत. त्यांच्यामुळे नव्या क्रिकेटपटूंना प्रेरणा मिळेल. डोमेस्टिक स्पर्धांमध्ये ते खेळतील. आयपीएल स्पर्धेपर्यंत पोहचावे असे त्यांना वाटेल. त्यांना आता बिहार सोडायची गरज नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com